**राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद,**

**महाराष्ट्र, पुणे**

# नवोपक्रम स्पर्धा सन 2023-24

**प्राथमिक शिक्षक गट**

**<u>नवोपक्रमाचे शीर्षक</u>**

## ‘माझा वर्ग, माझी कृती-क्षेत्रभेटीतून अध्ययन अनुभूती’

**<u>स्पर्धकाचे नाव</u>**

**श्री. सुनिल रामचंद्र कारंजकर**

**B.A. B.Ed**

**9373072979**

E-Mail : sunilkaranjkar98@gmail.com

**विद्यामंदिर कुडू, ता. करवीर, जि. कोल्हापूर**

**U-Dise Code : 27340507401**

# नवोपक्रम स्पर्धा सन 2023-24

## स्पर्धक शिक्षकाची माहिती



| | |
|---|---|
| स्पर्धकाचे नाव | : श्री. सुनिल रामचंद्र कारंजकर |
| पद | : पदवीधर अध्यापक |
| शाळेचे नाव | : विद्यामंदिर कुर्डू, ता. करवीर, जि. कोल्हापूर-416001 |
| मो.नं. | : 9373072979 |
| ईमेल | : sunilkranjkar98@gmail.com |
| युडायस नं. | : 27340507401 |
| शैक्षणिक अर्हता | : बी. ए. बी. एड्. |
| जन्मतारीख | : 01/06/1968 |
| शैक्षणिक अनुभव | : 34 वर्षे |
| नवोपक्रम गट क्र. | : 2 |
| नवोपक्रमाचे नाव | : प्राथमिक |
| नवोपक्रम शिर्षक | : 'माझा वर्ग, माझी कृती-क्षेत्रभेटीतून अध्ययन अनुभूती' |

## प्रतिज्ञापत्र

मी श्री. सुनिल रामचंद्र कारंजकर प्रतिज्ञापत्र लिहून देतो की, या नवोपक्रम स्पर्धेसाठी सादर केलेला **'माझा वर्ग, माझी कृती-क्षेत्रभेटीतून अध्ययन अनुभूती'** हा नवोपक्रम माझ्या स्वत:च्या शैक्षणिक उपक्रमांवर, अनुभवांवर आधारित आहे. हा उपक्रम मला स्वत:ला सुचलेला आहे. काल्पनिक नाही. तसेच भारतीय अथवा विदेशी लेखकांच्या ग्रंथातील अथवा संशोधनातील माहितीच्या आधारे हा नवोपक्रम लिहीलेला नसून यामध्ये जाणवलेल्या समस्येचा मी सुक्ष्म अभ्यास केलेला आहे. हा नवोपक्रम मी यापुर्वीच्या राज्यस्तरीय स्पर्धेसाठी सादर केलेला नाही. तसेच इतर कोणत्याही व्यक्तीकडून लिहून घेऊन तो माझ्या नावावर सादर केला नाही. तसे आढळून आल्यास (Copyright Act 185) खाली दाखलपात्र गुन्हा आहे याची मला कल्पना आहे.

दिनांक : ८/१२/२०२३

स्थळ : कुर्डू

स्पर्धकाची स्वाक्षरी

नाव : श्री. सुनिल रामचंद्र कारंजकर

शाळेचा / कार्यालयाचा शिक्का

विद्या मंदिर, कुर्डु
जा.नं.
ता. करवीर जि. कोल्हापूर

# प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की, श्री.सुनिल रामचंद्र कारंजकर हे माझ्या शाळेत कार्यरत असून त्यांनी सादर केलेला माझा वर्ग माझी कृती, क्षेत्रभेटीतून अध्ययन अनुभूती हा नवोपक्रम शैक्षणिक वर्ष 2023-24 मध्ये त्यांनी स्वत: राबविलेला असून ती त्यांच्या स्व परिश्रमाची फलश्रुती आहे. हा नवोपक्रम त्यांनी राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे मार्फत आयोजित यापूर्वीच्या राज्यस्तरीय नवोपक्रम स्पर्धेसाठी सादर केलेला नाही.

दिनांक : ८/१२/२०२३
स्थळ : कुर्डु

मुख्याध्यापक
विद्या मंदिर कुर्डु
ता. करवीर जि. कोल्हापूर

शाळा/कार्यालय प्रमुखांची स्वाक्षरी
नांव : श्री.बाळासाहेब शंकर कांबळे

**प्रस्तावना**

शिक्षण ही वारंवार शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली चालणारी प्रक्रिया आहे. शिक्षण ही अध्ययन सुकर करणे, त्याचबरोबर ज्ञान,कौशल्ये, मूल्ये, विश्वास, क्षमता व सवयीच्या प्राप्तीची प्रक्रिया आहे. विद्यार्थ्यांची अध्ययन प्रक्रिया सुलभ, सुकर होण्याकरिता विद्यार्थ्यांच्या क्षमता विकसित होण्याकरिता, सर्वांगीण विकास होण्याकरिता अध्ययन अनुभवातून शिक्षण देणे गरजेचे आहे.

अध्ययन अनुभव दोन प्रकारे देता येतात. 1) प्रत्यक्ष अध्ययन अनुभव व अप्रत्यक्ष अध्ययन अनुभव. प्रत्यक्ष अध्ययन अनुभव हे विविध ज्ञानेंद्रियांच्या सहाय्याने. प्रत्यक्ष वस्तू, व्यक्ती, घटना, प्रसंग, ठिकाण दाखवून दिले जातात. तर जेव्हा प्रत्यक्ष अनुभव देणं शक्य नसते तेव्हा त्यांचे ज्ञान, एखाद्या साधनाच्या माध्यमातून देतो, तेव्हा त्यास अप्रत्यक्ष अध्ययन अनुभव म्हणतो.

प्रत्यक्ष अध्ययन अनुभवाच्या सहाय्याने दिलेले ज्ञान हे विद्यार्थ्याच्या कायमचेच लक्षात रहाते. म्हणून इयत्ता 7 वी च्या वर्गातील विद्यार्थ्यांना अध्ययन अनुभूती देण्यासाठी क्षेत्रभेटी व कृती या उपक्रमांची निश्चिती करण्यात आली.

इयत्ता 7 वी वर्गातील मराठी, गणित, सा. विज्ञान, इतिहास, भूगोल व ना. शास्त्र या विषयातील कोणत्या पाठासाठी कोणत्या क्षेत्रभेटी देता येतील. क्षेत्रभेटीतून त्या पाठातील कोणते अध्ययन अनुभव देता येतील. त्याचबरोबर व्यक्तीमत्त्व विकासासाठी कोणत्या क्षेत्रांना भेटी देता येतील. या सर्व गोष्टी विचारात घेऊन नियोजन करण्यात आले.

कृती या उपक्रमांतर्गत विज्ञानातील प्रयोग, कला, कार्यानुभवातील संस्कार घडविणाऱ्या कृती विद्यार्थ्यांच्याकडून प्रत्यक्ष करवून घेतल्या; तर मिळणारे अध्ययन अनुभव विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास साधण्यास उपयुक्त ठरतील. हे ओळखून

सा. विज्ञान विषयातील कोणते घटकांचे सहज. साध्या, सोप्या प्रयोगातून अध्ययन अनुभव देता येतील. त्या प्रयोगांचे कला-कार्यानुभवासाठी कराव्या लागणाऱ्या कृती, त्याचबरोबर संस्काराची, मूल्यांची रुजवण करणाऱ्या अध्ययन अनुभवाची कृती यांचे नियोजन करण्यात आले.

क्षेत्रभेटीतून उद्योग, व्यवसाय, कारखाने यांचे प्रत्यक्ष अध्ययन अनुभव देण्यात आले. ऐतिहासिक माहितीचे अध्ययन झाले. सामान्य विज्ञान या विषयातील सजीव सृष्टीचे ज्ञान परिसर भेटीतून अनुभवता आले. कविताचे अध्ययन परिसरातून प्रत्यक्ष अनुभवातून मिळाले. बँकेचे व्यवहार बँक क्षेत्रभेटीतून अध्ययन मिळाले. कृती या उपक्रमांतर्गत हवेचे, पाण्याचे, मृदेचे गुणधर्म प्रत्यक्ष प्रयोगातून अनुभवता आले. कला-कार्यानुभव विषयांतर्गत कृतीतून अध्ययनाची अनुभूती घेता आली. संस्काराचे बीजे, मूल्ये प्रत्यक्ष कृतीतून रुजविण्यात आली. परिपाठ, प्रार्थना, राष्ट्रगीत, समूहगीते, वाद्य वाजविण्याच्या कृतीतून सादर होवू लागला. फलक लेखन, विद्यार्थी करु लागलेत. रांगोळी घालू लागलेत, वर्गसजावट, शैक्षणिक साधने बनविली गेली. क्षेत्रभेट कृती या उपक्रमातून आनंददायी पध्दतीने अध्ययनाची अनुभूती घेऊन विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास, संस्कार, मूल्ये, अध्ययन क्षमता सहज साध्य झाले. मुलांचं मन नुकत्याच उमललेल्या फुलासारखं असतं, आभाळात विहरणाऱ्या पक्षागंत असतं, काजळभरल्या मेघाकडे बघून थुई थुई नाचणाऱ्या मोरागत असते. कुंभारानं मळलेल्या मातीगंत असतं. त्यांना योग्य वयातच योग्य असे भरीव मार्गदर्शन करणं गरजेचे असतं. अशी मुलं मग कोणत्याच क्षेत्रात मागे पडत नाहीत. असे ही लहान मुले 21 व्या शतकात कोणत्याच क्षेत्रात मागे पडू नयेत. सर्वच क्षेत्रात गरुडभरारी घेता यावी यादृष्टीने प्रस्तुत नवोपक्रम विद्यार्थी, पालक, शिक्षक, यांना उपयुक्त असून सदर नवोपक्रमाची गाथा व यशस्वीता आपणासमोर मांडण्याचा हा प्रयत्न आहे.

## अनुक्रमणिका


| अ.नं. | अहवाल लेखन घटक | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| 1 | नवोपक्रमाचे शीर्षक | 1 |
| 2 | नवोपकमाची गरज व महत्‌त्व | 2-7 |
| 3 | नवोपक्रमाची उद्दीष्टे | 7 |
| 4 | नवोपक्रमाचे नियोजन | 8-16 |
| 5 | नवोपक्रमाची कार्यपध्दती | 17-39 |
| 6 | नवोपक्रमाची यशस्विता / फलनिष्पती | 40-41 |
| 7 | समारोप | 42 |
| 8 | संदर्भसूची व परिशिष्टे | 43-47 |

1. नवोपक्रमाचे शीर्षक

# ‘माझा वर्ग,

# माझी कृती-क्षेत्रभेटीतून

# अध्ययन अनुभूती’

**नवोपक्रमाची गरज व महत्त्व:**


1) नवोपक्रमाची गरज :-

शरीराला श्रमाकडे, बुध्दीला सत्याकडे, हृदयाला भावनेकडे आणि भावनेला माणुसकीकडे वळविणे म्हणजेच शिक्षण होय. प्राथमिक शिक्षण हे सर्व शिक्षणाचा पाया. त्यासाठी शिक्षणाचा पाया अतिशय दर्जेदार व गुणवत्तेचा असणे गरजेचे आहे. इयत्ता 7 वी वर्गातील विद्यार्थ्यांचा पाया गुणवत्ता पुर्ण होण्यासाठी अध्ययन अनुभवातून शिक्षण देणे महत्वाचे आहे. म्हणून प्रस्तूत नवोपक्रमाची गरज आहे.

'मी ऐकले, मी विसरलो
मी पाहिले, माझ्या लक्षात राहिले.
मी केले, मला समजले.
मी अनुभवले, मला उमगले'

या ओळीवरुन असे लक्षात येते की, ऐकलेले ठराविक कलावधीपर्यंतच लक्षात रहाते. प्रत्यक्ष पाहिलेले त्यापेक्षा अधिक कालावधीपर्यंत लक्षात रहाते. एखादी गोष्ट केलेली असेल तर ती गोष्ट चांगली समजते. पण एखाद्या गोष्टीचा अनुभव घेतला असेल तर ते चांगले उमगून कायमचेच लक्षात रहाते. म्हणून अध्ययन प्रक्रिया स्मरणात राहणेसाठी प्रस्तुत उपक्रमाची गरज आहे.

एडगर डेल यांचा अनुभव शंकू



एडगर डेल यांचा हा अनुभव शंकू काय दर्शवतो?

शंकूचे शिखर हे सर्वात अमूर्त आहे. तेथील अनुभव हे बोललेला शब्द ऐकणे असे आहे. शंखू असे दर्शवितो की, तुम्ही जसजसे शंकूच्या खाली तळाकडे जावू तितके जास्त शिक्षण आणि अधिक माहिती मिळते व टिकून रहाते. प्रत्यक्ष उद्देशपुर्ण अनुभवातून घेतलेले शिक्षण आधिक मिळते व टिकून रहाते म्हणून नवोपक्रमाची गरज अधिक आहे.

वर्गातील अध्ययननिष्पती, क्षेत्रानुसार क्षमता विद्यार्थ्यांमध्ये पुरेशा प्राप्त होत नसल्याचे निदर्शनास दिसून येत होते. इयत्ता 7 वी वर्गातील अध्ययन निष्पती, क्षेत्रनिहाय क्षमता विद्यार्थ्यांनी प्राप्त करण्यासाठी, विद्यार्थ्यांचा सर्वांगिण विकास होण्यासाठी एडगर डेल यांच्या अनुभव शंकुच्या तत्त्वानुसार प्रत्यक्ष अध्ययन अनुभवातून शिक्षण देणे गरजेचे होते.

‘खडकाळ मातीला ओल आणा
जमीन वांझ असत नाही
बालपणीच संस्कार, मूल्ये रुजवा
संस्कृती आयात होत नाही.’

विद्यार्थ्यांच्यात योग्य वयात योग्य असे संस्कार, मूल्ये रुजणं गरजेचे असतं. पण हे संस्कार, मूल्ये सांगून रुजत नसतात. तर ती कृतीतून अंगी बाणवायची असतात. कला, कार्यानुभवसाठी कृतीची गरज असते. विज्ञान विषयातील प्रयोग करण्यासाठी कृतीची गरज असते. कृतीतून आत्मसात केलेले ज्ञान कायमचे स्मरणात राहते, म्हणून प्रस्तुत नवोपक्रमाची गरज आहे.

रांगोळी, फलक लेखन, हस्ताक्षर, वर्गसजावट, शैक्षणिक उठाव, प्रदर्शन, गायन, वादन,नृत्य, नाट्य, उपस्थिती या सर्व बाबी कृतीतूनच साधल्या जातात. सर्वच विषयासाठी प्रस्तुत उपक्रमाची गरज आहे.

क्षेत्रभेट व कृतीतून अध्ययन अनुभूती साध्य करावयाच्या असल्याने मुक्त आणि आनंददायी पध्दतीने अध्ययन अनुभव घ्यायचे स्वातंत्र्य असलेला प्रस्तुत नवोपक्रम माझ्या वर्गासह इतरानाही दिशादर्शक ठरण्यासाठी प्रस्तुत नवोपक्रमाची गरज ओळखून नवोपक्रमाची काटेकोरपणे आखणी करण्यात आली.

**11) उपक्रमाचे महत्त्व**

प्रस्तुत उपक्रमातून विद्यार्थ्यांच्यात शारीरिक, बौद्धिक, गुणात्मक, सामाजिक, सांस्कृतिक होणारा विकास खालील प्रमाणे-

- मराठी विषयातील अध्ययन निष्पत्ती व क्षमता क्षेत्र भेटी, परिसर भेटी तसेच कृतीच्या अध्ययन अनुभूतीतून साध्य करता येते.
- इंग्लिश विषयाच्या ॲक्टिव्हिटीज कृतीच्या माध्यमातून आत्मसात करता येतात.
- गणित विषयातील भौमितिक रचना, पूर्णांक संख्यांचा गुणाकार, लसावी, मसावी कोन व कोनाच्या जोड्या कृतीतून अनुभवता येतात बँक व सरळव्याज बँकेस क्षेत्रभेट देऊन अध्ययन अनुभव घेता येतात.
- सजीव सृष्टी, अनुकूलन, वनस्पती रचना व कार्य, वनस्पतींचे अवयव, सजीवातील पोषण, परिसर, जंगल भेटीतून अध्ययन अनुभूती घेता येते नैसर्गिक संसाधनाचे गुणधर्म कृती प्रयोगातून अनुभवता येतील.

- इतिहासाची साधने, ऋतू निर्मिती, सूर्य, चंद्र व पृथ्वी, भरती ओहोटी क्षेत्रभेटीतून व कृतीतून क्षमता अध्ययन निष्पत्ती साध्य करता येतील.
- संस्कार व मूल्ये कृतीतून रुजवता येतील.
- कला, कार्यानुभव विषयाच्या अध्ययन निष्पत्ती परिपाठास प्रार्थना राष्ट्रगीत वाद्यावर वाजविणे, नाट्य, लेझीम, प्रदर्शन या कृतीतून अध्ययन अनुभव देता येतील.
- आनंददायी पद्धतीने अध्ययन करतील अध्ययनातील उत्साह वाढेल.
- व्यवसाय कारखान्याची माहिती मिळेल, स्वरचित कविता लिहिणे, निबंध लिहिणे, गोष्टी लिहिणे इत्यादीचा स्वनिर्मितीचा आनंद मिळेल.
- वृद्धाश्रम यासारखे उपक्रमातून भावनिकता विकसित होईल.
- अध्ययन अनुभूतीतून अध्ययन करावयाचा प्रस्तुत उपक्रम असल्याने विद्यार्थ्यांचे सर्वांगीण विकास होण्याच्या दृष्टीने प्रस्तुत उपक्रम महत्त्वाचा आहे.

**12) उपक्रमाचे वेगळेपण**

क्षेत्रभेटी, परिसर भेटी, कृती अशा विविध कृतीशील आनंददायी उपक्रमातून अध्ययन अनुभूती देणारा प्रस्तुत उपक्रम आहे.

क्षेत्रनिहाय क्षमता वाढविण्यासाठी, अध्ययन निष्पत्ती प्राप्त करण्यासाठी, संस्कार मूल्य रुजवण्यासाठी, सर्वांगीण विकास साधण्यासाठी, शारीरिक, बौद्धिक, गुणवत्ता विकासासाठी उपयुक्त असा प्रस्तुत उपक्रम आहे.

सर्वच विषयांची अध्ययन अनुभूती देणारा, स्वयं अध्ययनास संधी देणारा, स्वतंत्र असणारा प्रस्तुत उपक्रम आहे. निबंध गोष्टी प्रसंग यावर स्व अभिवृत्ती निर्माण करणारा व स्वरचित कविता लिहिणारा उपक्रम आहे. गायन, वादन, नृत्य, नाट्य,

चित्र, रांगोळी, हस्तकला या आंगिक कौशल्यांचा विकास करण्यास प्रवृत्त करणारा प्रस्तुत उपक्रम आहे.

शैक्षणिक उठावात हातभार लावणारा, प्रज्ञाशोध परीक्षेची तयारी करण्यास उपयुक्त असणारा, प्रदर्शन मांडण्यास उपयुक्त असणारा प्रस्तुत उपक्रम आहे.

जयंती, पुण्यतिथी साजरी करण्यास प्रोत्साहन देणाऱ्या, वक्तृत्व शैली विकसित करण्यास उपयुक्त असा उपक्रम आहे.

हस्ताक्षर वळणाक्षर काढण्यास प्रभाव पाडणारा, आई-वडिलांच्या पाया पाडण्यास संस्कार घडविणारा, शैक्षणिक साधने व वर्ग सजावट करण्यास प्रवृत्त करणारा, नाणीसंग्रह करण्यास प्रोत्साहन देणारा प्रस्तुत उपक्रम आहे. अध्ययन अनुभवातून व कृतीतून अध्ययन करणारा उपक्रम असल्याने मिळालेले ज्ञान, कौशल्ये, मूल्ये, संस्कार, गुणवत्ता, क्षमता, अध्ययन निष्पत्ती कायमच्या स्मरणात राहण्यास उपयुक्त ठरणारा प्रस्तुत उपक्रम आहे.

**नवोपक्रमाची उद्दिष्टे**

1) क्षेत्रभेटी व कृतीतून अध्ययन अनुभूती घेणे.
2) सर्व विषयातील क्षेत्रनिहाय सर्व क्षमता अध्ययन निष्पत्ती प्राप्त करणे.
3) संस्कार, मुल्ये रुजवणे.
4) स्वयं निर्मितीचा आनंद मिळवणे.
5) व्यवसायांची, उद्योगांची, कारखान्याची माहिती करून घेणे.
6) कला, हस्तकला, कार्यानुभव कौशल्य आत्मसात करणे.
7) शारीरिक, बौद्धिक, भावनिक गुणवत्ता वाढविणे.

**4. नवोपक्रमाचे नियोजन**

कोणतेही कार्य करण्यापूर्वी त्या कार्याची पूर्वतयारी करणे म्हणजे नियोजन नियोजनात भविष्यात उपक्रमांची ब्ल्यू प्रिंट आधी ठरवली जाते नियोजनामुळे ठरलेली उद्दिष्टे, ध्येय, साध्य करता येतात प्रस्तुत नवोपक्रमाचे नियोजन खालील प्रमाणे करण्यात आले.

**उपक्रम पूर्वस्थितीचे निरीक्षण**

1) इयत्ता सातवी वर्गातील 22 विद्यार्थ्यांपैकी बरेच विद्यार्थी बोलके नव्हते खेड्यात वाढलेले हे विद्यार्थी परिसरातील अनुभवाबाबत अनभिज्ञ होते.
2) आत्मविश्वास नव्हता.
3) नवीन शिक्षक अथवा साहेबांनी वर्गात भेट दिली असता प्रश्नांची उत्तरे देत नव्हते.
4) चर्चेत सहभाग घेताना न्यूनगंड दिसून येत होता.
5) अध्यापन प्रसंगी बऱ्याच संकल्पना, संबोध यांचे आकलन होत नसल्याचे दिसून आले.
6) अध्ययनात विद्यार्थ्यांची निरसता दिसून येत होती.
7) शाळेत अथवा जादा तासाला वेळेत न येण्याची अथवा शाळा चुकवण्याची त्यांची वृत्ती होती.
8) अध्ययनात एकाग्रता नसल्याने बऱ्याच संकल्पनांचे आकलन होत नव्हते.
9) जरी संकल्पनांचे आकलन झाले, तरी त्यांचे विस्मरण व्हायचे.
10) हस्ताक्षर वळणदार नव्हते.
11) कला, कार्यानुभव विषयांमध्ये सुद्धा रुची नसल्याचे दिसून येत होते.
12) या सर्व कारणांचा शोध घेतला असता निदर्शनास आले ते म्हणजे विद्यार्थ्यांची एकाग्रता नसणे.
13) शिकण्यात गोडी, रुची आनंद नसणे. अध्ययन केलेले विसरून जाणे यावर मला उपाय सापडला तो म्हणजे अध्ययन अनुभूतीतून अध्ययन करणे.

**II. संबंधित व्यक्तीशी तज्ज्ञांची चर्चा**

विद्यार्थ्यांची अध्ययन क्षमता असणाऱ्या समस्यांची उकल होताच क्षेत्रभेटी व कृतीतून अध्ययन अनुभूती देण्याचे निश्चित केल्यानंतर अनुभवी तज्ज्ञ व्यक्तींची चर्चा करून मार्गदर्शन घेण्यात आले.

जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था कोल्हापूर वरिष्ठ अधिव्याख्याते डॉक्टर राजेंद्र भोई सर यांना नवोपक्रमाच्या कार्यवाही बाबत व राबवल्या जाणाऱ्या उपक्रमावर चर्चा केली असता, सरांनी खूप बहुमोलाचे मार्गदर्शन केले. त्यामुळे उपक्रम राबविण्याचा मार्ग सुकर झाला. डाएट अधिव्याख्याता डॉ. अंजली रसाळ, मा. सरिता कुदळे यांचे बहुमोल मार्गदर्शन लाभले.

पंचायत समिती करवीरचे गटशिक्षणाधिकारी मा. समरजीत पाटील साहेब, शिक्षण विस्तार अधिकारी मा, एस. के. यादव साहेब, मा. विश्वास सुतार साहेब मा. आनंदराव आकुर्डेकर साहेब, मा. अर्चना पाथरे मॅडम, मा. सुजाता गायकवाड मॅडम माजी प्राचार्य माननीय संभाजी गंगापुरे यांचे बहुमोल मार्गदर्शन मिळाले.

उपक्रमशील शिक्षिका सौ. अलका कारंजकर, श्री विष्णू पाटील, दत्तात्रय पाटील, पदवीधर अध्यापक श्री. एम. एल. महाजन, शालेय व्यवस्थापन समिती, पालक यांचे अनमोल सहकार्य मिळाले.

### III. आवश्यक साधनांचा विचार

प्रस्तुत नवोपक्रमासाठी खालील मूल्यमापन साधने वापरली.

1) निरीक्षण नोंदी

2) पूर्व चाचणी (घटकावर आधारित विद्यार्थ्यांसाठी)

नवोपक्रम सुरू करण्यापूर्वी विद्यार्थ्यांची अध्ययन क्षमता व अध्ययन निष्पत्ती कितपत साध्य आहेत हे पडताळण्यासाठी पूर्व चाचणी प्रश्नावली घेण्यात आली.

3) अंतिम चाचणी (घटकावर आधारित विद्यार्थ्यासाठी)

नवोपक्रमाच्या कार्यवाहीनंतर उद्दिष्टे कितपत यशस्वी झाली हे पडताळणीसाठी अंतिम चाचणी प्रश्नावली घेण्यात आली.

क्षेत्रभेटीतून व कृतीतून अध्ययन अनुभूती मिळण्यासाठी आयोजित विविध उपक्रमासाठी पुढील साधनांचा वापर करण्यात आला.

1) रोटरी क्लब ऑफ कोल्हापूर हेरिटेज कडून प्रोजेक्ट देण्यात आला.

2) शिवराय तरुण मंडळ कडून 3 संगणक देण्यात आले.

3) संदीप पाटील यांचे कडून 2 एलईडी संच देण्यात आले.

4) प्रत्येकी पालकांनी रुपये 1000/- याप्रमाणे 22000 रु. डिजिटल खोली करण्यास दिले.

5) लेझीम, हलगी, घुमके, त्याचबरोबर परिपाठास आवश्यक असणाऱ्या वाद्यांचा खर्च मी स्वतः केला.

6) आकाश कंदील साठी प्लास्टिक बाटल्या, कागद या साधनांचा वापर केला.

7) राखी बनवण्यासाठी टाकाऊ मणी लोकर या साधनांचा वापर केला.

**IV) करावयाच्या कृतीचा क्रम :**

1. इयत्ता सातवीच्या वर्गातील विद्यार्थी अध्ययन क्षमतेत मागे राहण्याच्या समस्यांचा शोध घेणे.
2. नवोपक्रम निश्चिती करणे.
3. तज्ज्ञांशी चर्चा व मार्गदर्शन करणे.
4. पालकांशी चर्चा
5. घटकावर आधारित विद्यार्थ्यांची पूर्व चाचणी घेणे.
6. क्षेत्रभेटी अंतर्गत उपक्रमांचे नियोजन करणे.
7. कृती उपक्रमांतर्गत उपक्रमाचे नियोजन करणे.
8. क्षेत्रभेटी व कृती अंतर्गत उपक्रमांची अंमलबजावणी करणे.
9. घटकावर आधारित विद्यार्थ्यांची उत्तर चाचणी वरुन निष्कर्ष काढणे.

## V) उपक्रमोत्तर स्थितीची निरीक्षण

नवोपक्रमाची निश्चिती केल्यानंतर घटकावर आधारित विद्यार्थ्यांची पूर्व चाचणी घेतली क्षेत्रभेटी व कृती अंतर्गत उपक्रमाची अंमलबजावणी केल्यानंतर नवोपक्रमोत्तर घटकावर आधारित विद्यार्थ्यांची उत्तर चाचणी घेतली. पूर्व चाचणी व उत्तर चाचणी यातील सारणीवरून निष्कर्ष मांडण्यात आले. निष्कर्षातून विद्यार्थ्यांमध्ये अपेक्षित वर्तन बदल घडून आले ते खालीलप्रमाणे-

- अवघड संबोध, संकल्पना यांची उकल झाली. अनुभवातून व कृतीतून अध्ययन केल्यामुळे विद्यार्थ्यांची आवड व अभिरुची निर्माण झाली. विद्यार्थ्यांच्यात स्वयं अध्ययनाची सवय निर्माण झाली.
- श्रवण, भाषण-संभाषण, वाचन व लेखन ही कौशल्ये विकसित झाली.
- अध्ययन क्षमता अध्ययन निष्पत्ती प्राप्त झाल्या.
- सर्व विषयांमध्ये सर्व क्षेत्रांमध्ये विद्यार्थ्यांच्यात अभिरुची निर्माण झाली.
- आई, वडील, गुरुजन, वडीलधारी मंडळीचा आदर ठेवू लागली.
- नाट्य, संवाद नाट्यछटेतून पाठ सादर करू लागली.
- संस्कार व मूल्यांची रुजवणूक झाली. भावनिकता निर्माण झाली. सहकार्य वृत्ती अंगी बाणली.
- कविता, गोष्टी इत्यादीची स्वनिर्मिती करू लागले.
- विविध व्यवसाय व कारागिरांचे कौशल्य समजले.
- देशभक्ती, राष्ट्रभक्ती वाढीस लागली.
- कलेची अभिरुची निर्माण झाली.
- वादन करू लागली.
- निरीक्षण वृत्ती वाढली.
- नाणी संग्रह करण्याची सवय जडली.
- आत्मविश्वास वाढीस लागला. विद्यार्थ्यांची उपस्थिती 100% राहिली.

**कार्यवाहीचे टप्पे (वेळापत्रक)**

प्रस्तुत नवोपक्रम अंतर्गत प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष अध्ययन अनुभवांच्या माध्यमातून हसत-खेळत आनंददायी पद्धतीने मुक्तपणे स्वयंअध्ययनातून विद्यार्थ्यांचा बौद्धिक, भावनिक, मूल्यात्मक, गुणात्मक, सर्वांगीण विकास करण्यात आला. प्रस्तुत नवोपक्रमाचे कार्यवाहीचे टप्पे (वेळापत्रक) खालील प्रमाणे आहे.

| अ.नं. | महिना/वर्ष | उपक्रम |
|---|---|---|
| 1 | जून 2023 | समस्यांचा आढावा, तज्ज्ञांची चर्चा नवोपक्रमांतर्गत घ्यावयाच्या उपक्रमांचे नियोजन पूर्व चाचणी छ शाहू महाराज जयंती दसरा चौक ते बिंदू चौक मिरवणूक लेझीम पथक |
| 2 | जुलै 2023 | खेळ खेळूया शब्दांचा, अनुभवूया भौमितिक रचना कृती, गुरुपौर्णिमा (कृती) परिसरात जाऊ सजीव सृष्टी पाहू, शिकू अनुकूलन व वर्गीकरण, (क्षेत्रभेट) छत्रपती शाहू महाराज जन्मस्थळ / स्मारक क्षेत्रभेट, नाणी प्रदर्शन, खेळ खेळू सूर्य पृथ्वी चंद्रांचा, लोहार व्यवसाय क्षेत्रभेट, कुक्कुटपालन व्यवसाय क्षेत्र भेट, फिरती पालक अभिप्राय वही, स्वरचित कविता लेखन, निबंध, गोष्टी लेखन |
| 3 | ऑगस्ट | 'श्रावणमास' निसर्गात शिकू-कविता क्षेत्रभेट, अनुभवूया कोनांच्या जोड्या कृती, परिसरात जाऊ जाणून घेऊ, वनस्पतींचे अवयव क्षेत्रभेट, अंकुर आणि आदी मूळ यांचे निरीक्षण (प्रयोग), (कृती), फुलांची रचना भागांचे निरीक्षण (प्रयोग) (कृती) प्रयोगातून विज्ञान निरनिराळ्या वनस्पतीतून होणाऱ्या बाष्प उत्सर्जनाची तुलना करणे, स्वनिर्मित राख्या सीमेवरील सैनिकांना पाठवणे. (कृती), सुतार व्यवसाय (क्षेत्रभेट), स्वच्छता पंधरवडा, निबंध, चित्रकला घोषणा स्पर्धा, फिरती पालक अभिप्राय वही |
| 4 | सप्टेंबर 2023 | भांड्यांचे प्रदर्शन 'आम्ही भांडी बोलतोय' नाट्य कृती, |

| | | |
|---|---|---|
| | | आलेख काढू उत्तरे देऊ (कृती) हवेला वस्तुमान वजन दाब असतो, प्रयोगातून विज्ञान (कृती), प्रयोगातून विज्ञान वातावरणाचा दाब सर्व दिशांनी समान असतो (कृती), प्रयोगातून विज्ञान बर्नोलीचे तत्व पाण्याचा फवारा (कृती), प्रयोगातून शिकू सूर्यग्रहण चंद्रग्रहण (कृती), जाऊ काव्यांच्या गावा, छ. शाहू महाराज जुना पॅलेस वास्तु संग्रहालय (क्षेत्रभेट), शेळी पालन व्यवसाय (क्षेत्रभेट) माजी सैनिक सुदाम पाटील यांचे अनुभव, स्वरचित कविता लेखन, निबंध लेखन |
| 5 | ऑक्टोंबर 2023 | प्रदर्शन धान्यांचे डॉक्टर खानखोजे थोरांची ओळख (कृती), समप्रमाण व्यस्त प्रमाण शैक्षणिक साधनातून जाण-(कृती) प्रयोगातून विज्ञान बर्फाचे संघनन पाणी बाहेर पृष्ठभागावर जमा होते (कृती), शाळा भरली रान शिवारात मुलं रमली ऊस लावण करण्यात, प्रयोगातून विज्ञान पाणी गोठते तेव्हा प्रसरण पावते (कृती), प्रयोगातून विज्ञान बर्फाचे खडे पाण्यावर तरंगण्याचा अभ्यास (कृती), कणेरी मठ क्षेत्रभेट शाही दसरा महोत्सव आम्ही खेळतो रांगडा खेळ लेझीम, डुक्कर पालन व्यवसाय क्षेत्रभेट गाय पालन व्यवसाय क्षेत्रभेट, वृद्धाश्रम क्षेत्रभेट, स्वरचित कविता लेखन निबंध लेखन, फिरती पालक अभिप्राय वही |
| 6 | नोव्हेंबर 2023 | टाकाऊ प्लास्टिक बाटल्या पासून आकाश कंदील निर्मिती, विक्रीतून अर्थोत्पादन, आलो आम्ही बँकेत बँकेचे व्यवहार समजलेत, (क्षेत्रभेट), शाळा भरली शेत शिवारात (क्षेत्रभेट) फडात आली शाळा ऊस तोडणी पहायला (क्षेत्रभेट), (क्षेत्रभेट) भोगावती सहकारी साखर कारखाना, प्रयोगातून विज्ञान विरघळणे आणि द्रावणाची घनता यांच्यातील परस्पर संबंध ओळखणे, प्रयोगातून विज्ञान निरनिराळ्या मृदेचे नमुने गुणधर्म अभ्यासणे, फिरती पालक अभिप्राय वही |

**VII) उपक्रमासाठी इतरांची मदत**

'आम्ही भांडी बोलतोय' - या नाट्यीकरणासाठी श्री निवृत्ती पाटील यांनी आपले घर उपलब्ध करून देण्यास सहकार्य केले. लोहार व्यवसायाची ओळख श्री शंकर दादू सुतार यांनी करून दिली. कुक्कुटपालन व्यवसायाची माहिती श्री तानाजी पाटील यांनी करून दिली. भांड्यांच्या प्रदर्शनासाठी सर्व पालकांनी जुनी भांडी देऊन सहकार्य केले. क्षेत्रभेटीसाठी विद्यार्थ्यांना ने आण करण्यासाठी चालक श्री सरदार पाटील यांनी सहकार्य केले शेळी पालन व्यवसायाची ओळख तानाजी पाटील यांनी करून दिली. माजी सैनिक सुदाम पाटील यांनी एक दिवस शाळेत येऊन सीमेवरील सैनिकांचे अनुभव सांगितले. वृद्धाश्रम भेटीसाठी श्रीमती राजशेखर यांनी परवानगी दिली. उद्योजक संदीप पाटील यांनी दोन एलईडी दिले. रोटरी क्लब ऑफ हेरिटेज यांनी प्रोजेक्ट दिला. जय शिवराय तरुण मंडळाने 03 कॉम्प्युटर दिले. सुदाम पाटील यांनी फॅन दिला. सौ आक्काताई रघुनाथ साठे यांनी आरसा दिला. श्री संतोष बाबुराव पाटील यांनी घड्याळ दिले. श्री धनाजी वसंत सुतार यांनी डायस दिला डिजिटल खोलीसाठी आवाहन करताच प्रत्येक पालकांनी रुपये 1000 मदत केली. शेतकरी रंगराव पाटील यांनी ऊस लागवडची माहिती दिली. डुक्कर पालन व्यवसायाची श्री उत्तम पाटील यांनी माहिती करून दिली. शेळीपालन, कुक्कुटपालनाची माहिती तानाजी पाटील यांनी दिली. बँक मॅनेजर प्रशांत सांगावकर यांचे मोलाचे मार्गदर्शन मिळाले. पोलीस निरीक्षक उत्तम ढेरे वकील प्रकाश पाटील, सैनिक सुदाम पाटील यांनी वर्गात येऊन ज्ञान दिले.

**VIII) उपक्रमासाठी सादर करावयाचे पुरावे**

प्रस्तुत नवोपक्रम राबवित असताना उपक्रमा संबंधी आवश्यक वाटणारे पुरावे हे उपक्रमाची सत्यता पडताळणीसाठी उपयुक्त असतात असे सर्व पुरावे नवोपक्रम अहवालात जोडलेले आहेत कोण कोणते असे पुरावे जोडण्यात आलेले आहेत ते खालील प्रमाणे आहेत.

1) नवोपक्रम संबंधित वर्तमानपत्रात आलेल्या बातम्या.
2) उपक्रम संबंधित आवश्यक वाटणारे फोटो
3) नवोपक्रम संबंधित महत्त्वाच्या व्हिडिओची लिंक.
4) कृती कार्यक्रमांतर्गत उपक्रमांचे झेरॉक्स प्रती.
5) विद्यार्थ्यांच्या स्वरचित कवितांचे नमुने.
6) प्रसिद्ध झालेल्या उपक्रमांच्या बातम्यांची लिंक.

नवोपक्रमातील सर्व उपक्रमांची एकत्रित व्हिडिओ लिंक

**नवोपक्रमांची कार्यपद्धती**

पूर्वस्थितीची निरीक्षणे व त्यांच्या नोंदी

'**माझा वर्ग माझी कृती क्षेत्रभेटीतून अध्ययन अनुभूती**' हा उपक्रम इयत्ता 7 वी च्या वर्गात राबवण्यापूर्वी निरीक्षणातून निदर्शनास आलेल्या नोंदी खालील प्रमाणे-

1) विद्यार्थी बोलताना संकोच करत होती.
2) प्रश्नांची उत्तरे देत नव्हती.
3) आत्मविश्वास दिसून येत नव्हता.
4) न्यूनगंड वृत्ती होती.
5) विद्यार्थी दबकून बसलेले दिसायचे.
6) विद्यार्थी व्यक्त होत नव्हते.
7) अभिवृत्ती दिसून येत नव्हती.
8) स्वाध्याय, गृहपाठ करत नव्हते.
9) आई-वडिलांच्या, गुरुजनांच्या पाया पडत नव्हते.
10) समूहगीते, गायन, नृत्यात सहभाग घेत नव्हते.
11) निबंध, चित्रकला, वक्तृत्त्व स्पर्धेत सहभाग नसायचा.
12) स्वरचित कविता लिहीत नव्हते.
13) मिळविलेले ज्ञान स्मरणात राहत नव्हते.
14) संबोध संकल्पना समजलेले नव्हते.
15) कार्यानुभवाच्या वस्तू बनवत नव्हते.
16) लेझीम खेळत नव्हते.
17) व्यवसायांची अधिक माहिती नव्हती.

निरीक्षणातून वरील मुद्दे निदर्शनास आल्यानंतर विद्यार्थ्यांच्या मध्ये अपेक्षित वर्तन बदल घडवून आणण्यासाठी उपक्रमांची निश्चिती करून कार्यवाहीस सुरुवात झाली.

**II) कार्यवाहीदरम्यान केलेली निरीक्षणे व माहिती संकलन**

नवोपक्रमाची निश्चिती केल्यानंतर नवोपक्रमाची प्रत्यक्ष कार्यवाहीला सुरुवात केली कार्यवाही दरम्यान निरीक्षणातून निदर्शनास आलेल्या नोंदी खालील प्रमाणे-

1) क्षेत्रभेटी व कृतीतून अध्ययन अनुभूती घेताना विद्यार्थ्यांच्या मध्ये उत्साह वाढू लागला.
2) विद्यार्थी आनंदी दिसू लागले विद्यार्थी वेळेत शाळेवर येऊ लागले.
3) विद्यार्थ्यांची उपस्थिती 100% राहू लागली.
4) सर्व विद्यार्थी उपक्रमात सहभागी होऊ लागले.
5) विद्यार्थी बोलके होऊ लागले.
6) विद्यार्थी दररोज आई-वडिलांच्या पाया पडू लागले. गुरुजींच्या पाया पडू लागले.
7) विज्ञानाचे प्रयोग करू लागले.
8) समूहगीतात सहभाग घेऊ लागले.
9) कार्यानुभवच्या वस्तू बनवू लागले.
10) वादनात सहभाग घेऊ लागले.
11) स्वनिर्मित कविता लिहू लागले.
12) निबंध लिहू लागले.
13) प्रदर्शन मांडू लागले.
14) स्पर्धेत सहभाग घेऊ लागले.
15) बौद्धिक विकास वाढू लागल्याचे दिसून आले.
16) अध्ययन निष्पत्ती विकसित होऊ लागल्या.

**उपक्रम**

**1) शाळा आली जंगल परिसरात, भर पडली आमच्या ज्ञानात**

सामान्य विज्ञान विषयातील अनुकूलन व वर्गीकरण वनस्पतीचे अवयव वनस्पतीचे उपयोग याबाबतचे ज्ञान विद्यार्थ्यांना कुई गावचे शेजारी असणारे छोट्या जंगलात नेऊन प्रत्यक्ष  अनुभवातून दिले. जंगलात असणारे हिरडा, बेहडा, पळस, बिब्बा, पांगिरा अशा दुर्मिळ वृक्षांबरोबरच झुडपे, वेली यांचे औषधी उपयोग याचे ज्ञान दिले. जंगलातून, डोंगरातून जाताना विद्यार्थ्यांना स्वच्छंदी आनंद वाटत होता.

मराठी विषयातील बालकवी त्र्यंबक बापूजी ठोंबरे यांची **'श्रावणमास'** ही कविता जवळच असलेल्या डोंगर परिसरात विद्यार्थ्यांना श्रावण महिन्यातच शिकवली त्यामुळे विद्यार्थ्यांना विषयाचा आशय खूप चांगल्या पद्धतीने समजला.




**2) कृती करू, भूमिती शिकू**

गणित विषयातील,

1. भौमितिक रचना, कोन दुभाजक, रेषाखंडाचा लंबदुभाजक, त्रिकोणाच्या कोनाच्या दुभाजकांचा गुणधर्म, त्रिकोणाच्या बाजूंच्या लंबदुभाजकांचा गुणधर्म, त्रिकोण काढणे.

2. कोन व कोनाच्या जोड्या, कोनांचा अंतर्भाग व बाह्य भाग, संलग्न कोन, कोटी कोन, पूरक कोन, विरुद्ध किरण, रेषीय जोडीतील कोन, विरुद्ध कोन, बहूभूजाकृतींचे आंतर कोन, त्रिकोणाचा बाह्य कोन इत्यादी भूमितीय माहिती कृतीच्या साह्याने प्रत्यक्ष विद्यार्थ्यांच्याकडून करून घेतल्या.

**3) आलेख काढू, उत्तरे देऊ**

गणित विषयातील जोड स्तंभालेख विद्यार्थ्यांच्याकडून आलेख कागदावर काढून घेतले. आलेखाची अनेक उदाहरणे देऊन सराव करून घेतला. त्यामुळे आलेख काढणे आलेख वरील प्रश्नांची उत्तरे देणे सोपे झाले.

**4) गुरुपौर्णिमा**

आई, वडील व थोरांचा आदर ठेवण्याबरोबर दररोज आई-वडिलांच्या पाया पडण्याची कृती करण्यास विद्यार्थ्यांना सांगितली. दररोज याबाबत आढावा घेतला आणि आपोआप आई-वडिलांच्या पाया पडण्याची सवय विद्यार्थ्यांना रुजली. त्याच्या पलीकडे जाऊन विद्यार्थी दररोज गुरुजनांच्या पाया पडू लागले. या संस्काराचा एक भाग म्हणून गुरु पौर्णिमेला माझं फुलांच्या पाय घड्यांनी आणि फुलांच्या वर्षावाणी स्वागत केलं. पाद्यपूजन करून कोल्हापूर फेटा बांधून आणि मायेची शाल देऊन 'गुरू माझा देव, गुरु माझी श्रद्धा' हे गीत गाऊन मनोगतातून भावना व्यक्त करून, विद्यार्थ्यांनी माझा केलेला सत्कार माझ्यासाठी अनपेक्षित सरप्राईज होतं. मुलांच्या या श्रद्धेने मी भावनिक झालो. या कार्यक्रम प्रसंगी एका पालकांनी काढलेले उद्गार 'पेरलं तेच उगवलं' हे माझ्या काळजाच्या कप्प्यात जसेच्या तसे कोरले गेले कृतीतून केले गेलेले संस्कार हे कायमचेच रुजतात.

**5) खेळ खेळूया शब्दांचा (भाषिक खेळ)**

खेळातून मिळविलेले ज्ञान कायमचे स्मरणात राहते हे जाणून शब्दांच्या भेंड्या वाक्प्रचार, समानार्थी शब्द, विरुद्धार्थी शब्द, अलंकारिक शब्द, म्हणी यावर विविध खेळ घेतले आणि विद्यार्थ्यांना भाषिक खेळातून समानार्थी, विरुद्धार्थी, अलंकारिक शब्द अवगत झाले.

**6) शैक्षणिक साधनातून ज्ञान अप्रत्यक्ष अनुभवातून जाण**

गणित विषयातील समप्रमाण, व्यस्त प्रमाण, इंग्रजी विषयातील शब्द संपत्ती विकास, पाढे पाठांतर सराव शैक्षणिक साधनातून घेतला. वर्ग सजावटीसाठी विद्यार्थ्यांनी कल्पकतेने स्वतः शैक्षणिक साधने बनविली. या कृतीमुळे अध्ययन अनुभूती मिळाली.




**7) भरवू प्रदर्शन भांड्यांचे, धान्यांचे, नाण्यांचे**

मराठी विषयातील 'भांड्यांच्या दुनियेत' हा पाठ जुन्या दुर्मिळ भांड्यांचे प्रदर्शन भरवून अध्ययन केला. घरातून, गावातून, पाहुण्यांच्यातून, विद्यार्थ्यांनी ही भांडी जमविली होती. त्यामुळे त्या भांड्यांचे नाव, धातू, वापर याविषयी परिचय झाला.

मराठी विषयातील 'थोरांची ओळख डॉक्टर खानखोजे' कृषी क्षेत्रातील ओळख व्हावी व सामान्य विज्ञानातील अन्न सुरक्षिततेची काळजी याविषयी ज्ञान मिळावे यासाठी विविध धान्यांचे प्रदर्शन भरविण्यात आले.

इतिहासातील भौतिक साधने नाणी यांची ओळख व्हावी या हेतूने जुन्या दुर्मिळ नाण्यांचे प्रदर्शन भरवले.

प्रदर्शन भरविण्यासाठी विद्यार्थ्यांनी खूप मेहनत घेतली.



## कुर्डू शाळेत जुनी उपकरणे, भांड्याचे प्रदर्शन

धामोड : प्रतिनिधी

करवीर तालुक्यातील कुर्डू येथील विद्यामंदिरमध्ये जुन्या दैनंदिन वापरातील उपकरणे आणि भांड्याचे प्रदर्शन भरवले आहे. जुन्या वापरातील वस्तूंचे जतन होण्यासाठी गावोगावी अशा वस्तूंचे संग्रहालय होण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे. मुलांना जुन्या संस्कृतीची ओळख करून देण्यासाठी हे प्रदर्शन भरवण्यात आल्याचे अध्यापक सुनील कारंजकर यांनी सांगितले.

'भांड्यांच्या दुनियेत' हा पाठ शिकवताना पुस्तकी ज्ञानाला कृतीची जोड देण्यासाठी हे प्रदर्शन भरविल्याने सातवीच्या विद्यार्थ्यांमधून समाधान व्यक्त होत आहे. विद्यार्थ्यांनी गावातील अडगळीत पडलेल्या जुन्या वस्तू आणि भांडी शोधून या प्रदर्शनात मांडल्या होत्या.

कोल्हापूर जिल्ह्यात पर्यटन व्यवसाय वाढू लागल्याने प्रत्येक गावांमध्ये संस्कृतीचे जतन करण्यासाठी अशा जुन्या वस्तू आणि भांड्यांचे संग्रहालय केल्यास ते पाहण्यासाठी पर्यटक येतील आणि पर्यटनातून व्यवसाय वाढीस लागेल, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

कुर्डू : येथील विद्यामंदिरमध्ये शिक्षक सुनील कारंजकर यांच्या पुढाकाराने भरविण्यात आलेल्या जुन्या वस्तू आणि भांड्यांचे प्रदर्शन.

**9) शाळा भरली शेत शिवारात, मुले रमली ऊस लावणी करण्यात**

उसाची लावण कशी केली जाते याचे ज्ञान मिळण्यासाठी सर्व विद्यार्थ्यांना शेत शिवारात नेले रंगराव पाटील या शेतकऱ्याने ऊस लावणी संदर्भात माहिती दिली. विद्यार्थ्यांनी प्रात्यक्षिकातून ऊस लावण्याची अनुभूती घेतली शेतशिवारातील हळदीचे पीक, मिरचीचे पीक व ट्रॅक्टरने नांगरणी याविषयी माहिती जाणून घेतली.



## 10) खेळ खेळू सूर्य, चंद्र, पृथ्वीचा

भूगोल या विषयातील परिवलन व परिभ्रमण या संकल्पना स्पष्ट होण्यासाठी विद्यार्थ्यांना सूर्य, चंद्र, पृथ्वी बनवून फिरण्याची कृती घेऊन परिवलन व परिभ्रमण या संकल्पना स्पष्ट केल्या.

## 11) माझे निरीक्षण, माझे अनुमान

सामान्य विज्ञान या विषयातील आदीमूळ, अंकुर व फुलांची रचना विद्यार्थ्यांच्या निरीक्षणातून अनुमान काढून ज्ञान संपादित केले.

## 12) कार्यानुभवातून थोडे अर्थोत्पादन

रक्षाबंधन सणाला टाकाऊ वस्तु पासून विद्यार्थ्यांच्याकडून राख्या बनवून घेतल्या बनविलेल्या राख्यांच्या ग्रामपंचायत चौकात स्टॉल मांडून राख्यांची विक्री केली असता, रुपये 2220/- अर्थोत्पादन झाले.

दिवाळी सणाला पर्यावरण पूरक प्लास्टिक बाटल्यांपासून आकाश कंदील बनवून विक्री केली असता, रुपये 1800/- अर्थोत्पादन झाले. शिक्षणविस्तार अधिकारी मा. सौ. अर्चना पाथरे मॅडमनी वर्गाला भेट देऊन विद्यार्थ्यांचे खूप कौतुक केले.

### सुंदर आकाशकंदिल बनवून कुर्डू शाळेच्या विदयार्थ्यांनी कार्यानुभवाची खरी अनुभूती संपादन केली -शिक्षणविस्तार अधिकारी अर्चना पाथरे

कुर्डू/प्रतिनिधी : दीपावली निमित्त विद्यामंदीर कुर्डू येथील विद्यार्थ्यांना कार्यानुभवातील कलाकृतीला वाव देण्यासाठी व अर्थोत्पादन प्राप्त व्हावं या उद्देशाने पदवीधर अध्यापक सुनिल कारंजकर यांनी आकाश कंदील बनवण्याची कार्यशाळा घेऊन विध्यार्थ्यांकडून सुबक व सुंदर आकाश कंदील बनवून घेतले.



विद्यार्थ्यांनी बनविलेल्या या कार्यशाळेस शिक्षणविस्तार अधिकारी अर्चना पाथरे यांनी भेट दिली असता खूप सुंदर आकाशकंदील विद्यार्थ्यांनी बनवले असून.कार्यानुभव विषयाच्या खऱ्या अनुभूतीची प्रचिती विद्यार्थ्यांनी संपादित केली आहे असे मत त्यांनी व्यक्त केले.

विद्यार्थ्यांनी स्वत: बनविलेल्या आकाश कंदीलंचा स्टॉल मांडून विक्री करून अर्थोत्पादन केले. अध्ययन अनुभूती देणारा असा हा उपक्रम सर्वांनाच खूप भावला.

************

**13) प्रयोगातून विज्ञान, विज्ञानातून होऊ सज्ञान**

सामान्य विज्ञान या विषयातील उपलब्ध साहित्यातून प्रयोग करून विद्यार्थ्यांनी अनुभूती घेतली.

**प्रयोग**

1. निरनिराळ्या वनस्पतीतून होणाऱ्या बाष्पोत्सर्जनाची तुलना करणे.
2. हवेला वस्तुमान, वजन, दाब असतो.
3. बर्नोलीचे तत्व- पाण्याचा फवारा
4. बर्फाचे संघनन पाणी ग्लास बाहेर पृष्ठभागावर जमा होते.
5. पाणी गोठते तेव्हा प्रसरण पावते.

प्रत्यक्ष प्रयोग निरीक्षणातून अनुमान काढून अध्ययन संपादित केले.

**14) प्राथमिक व्यवसायाचे ज्ञान, भेट, पशुपक्षी पालन**


कुक्कुटपालन, डुक्कर पालन, शेळी पालन, गाय पालन या व्यवसायांना भेटी देऊन सदर व्यवसायांची माहिती घेतली.





## 15) स्वनिर्मिती आमची, निबंध कवितांची

विविध विषयांवर स्वभाषेत विद्यार्थ्यांनी निबंध लिहिले. स्वरचित वेगवेगळ्या विषयांवर कविता लिहिल्या. या स्वनिर्मितीतून विद्यार्थ्यांची प्रगल्भता वाढली. भाषिक विकास झाला.



★ आई ★

माझी आई आहे सुंदर फार
तीला आवडते गुलाब फार


तीच्यापुढे आम्ही सारखेच लहान
ती आहे सर्वांहून महान

आई करते आमच्यावर माया
आईचे संस्कार जाननाही वाया

आई देते सर्वांना मान
मी ठेवतो आईचा अभिमान

आईला वाटते काम करू
आई हा शब्द मी कसा विसरू

सतेज कृष्णात सुतार
इ. ७वी




आई

जन्म देणारी कोण? ती म्हणजे माझी आई. माझी आई मला खूप आवडते. ती माझ्यासाठी सर्वस्व आहे. मला काहीतरी झालं की तिच्या काळजात धस्स होत. माझी आई माझी खूप काळजी घेते. मला कोणी काही बोलले तर मी रुसून बसते तेव्हा माझी आई माझी समजूत काढते. माझ्या आईचं माझ्यावर खूप प्रेम आहे

'मला लावते चांगल्या सवई
ती म्हणजे माझी आई
माझी आई मला भरवते घास
मला म्हणते की रडू नको फक्त हास'

माझ्या डोळ्यात पाणी आलं की माझ्या आईच्या पण डोळ्यात पाणी येत. माझ्या आईनं माझ्यावर खूप चांगले संस्कार केलेले आहेत म्हणून माझ्या आईचा मला खूप खूप अभिमान वाटतो.

अंतरा श्रीकांत पाटील
इयत्ता - ७वी



नाव- तनया विष्णू पाटील
शाळेचे नाव- वि. मं. कुई
इयत्ता ७वी
ह. क्र. १९

* विषय- माझे शिक्षक *

"आपल्या जिवनात गुरूला सर्वात महत्वाचे स्थान आहे. आपल्यात संस्कार रुजविण्याचे कार्य आपले गुरु करतात. प्रत्येकाला आपल्या शाळेतील एखादे शिक्षक आवडतात. त्याचप्रमाणे मलासुद्धा माझे कारंजकर सर आवडतात. ते माझे वर्गशिक्षक आहेत.

"सुरुवातीला मला त्यांची खुप भीती वाटायची पण हळूहळू मला त्यांच्यातील भावनिकता व आत्मीयता पाहून माझ्या मनातील भिती दूर झाली. व त्यांच्यामुळे मला इंग्रजीसारखा विषय सोपा वाटू लागला व गणित विषय तर माझ्या आवडीचा झाला.

सर आम्हाला गणित विषय शिकवत असताना अतिशय सोप्या पद्धती सांगतात.

सरांनी आम्हाला शेतात घेऊन गेले व लावन कशी करतात हे प्रत्यक्ष दाखवून आमच्याकडूनही उसाची लावण करण्याचे प्रात्यक्षिक करवून घेतले. व भोगावती साखरकारखाना दाखवला तेथे साखर कशी करतात. हे आम्हाला प्रत्यक्ष दाखवले व कणेरीमठ दाखवला. वृद्धाश्रम दाखवून वृद्धांच्याबद्दल आदर ठेवण्याचे मुल्य रुजविले. आई वडिलांच्या नेहमी पाया पडण्याचे संस्कार माझ्यामध्ये सरांनीच रुजवला.

सरांनी आम्हाला प्रत्यक्ष भेटी देऊन. आमच्याकडून अनेक प्रयोग घेऊन शिकविल्याने मला शिक्षणाची गोडी वाटली. माझा आत्मविश्वास वाढला.

सरांनी आम्हाला लेझीम शिकविले.
सर आमचे खुप खुप लाड करतात. सरांनी आम्हाला स्वागत गीत व जयजय महाराष्ट्र गीत शिकवले. सरांच्यामुळे आमची खुप खुप प्रगती झाली.

अभ्यासाबरोबर ते आम्हाला इतर ज्ञान सांगतात. इतिहास हा पाठ शिकवत असताना इतिहासाची पुर्णपणे माहिती सांगतात. इतिहास विषयाचा तास संपुच नये असे वाटत राहते.

आम्हाला गरज असल्यास ते आम्हाला माझ्या आईवडिलांच्या प्रमाणे, मित्राप्रमाणे साथ देतात. त्यांच्यामुळे मला दररोज शाळेत जावेसे वाटते.

सरांनी मला संस्कारभारती रांगोळी काढायला शिकवली सरांनी आम्हाला भाषण कसे म्हणायचे व हातवारे कसे करायचे व आवाजाचा चढउतार कसा करायचा याबाबत मार्गदर्शन केले


माझ्या सरांनी कार्यानुभव विषयाच्या वस्तु करण्यास शिकविले प्रयोग शिकविले. यावर्षी आमच्या वर्गाची तपासणी गटशिक्षणाधिकारी मा. समरजित पाटील साहेबांनी दीड तास घेतली आम्ही सर्वांनी मराठी इंग्रजी विषयाचे खुप छान वाचन केले, सर्व प्रश्नांची उत्तरे दिली.

साहेबांनी आमच्या वर्गाचे खुप कौतुक केले शंभर टक्के वर्ग प्रगत असल्याचे बोलले तेव्हा आमचे कारंजकर सर खुप खुश झाले.

माझे सर माझ्यासाठी नेहमी आदर्श आहेत आणि आदर्शच राहतील आज माझ्यात जे चांगले गुण आहे. ते फक्त आणि फक्त सरांच्यामुळेच

"सर तुमचा आशिर्वाद
लाभो माझ्या आयुष्याला
तुमचा हा आशिर्वादच
शिकवेल मला आदर्श
जगायला."

5G



★ सावित्रीबाई फुले ★

सावित्रीबाई फुले होत्या विद्येच्या देवता
त्या बनल्या मुलांच्या माता

सावित्रीबाईंनी काढली पहिली शाळा
आम्हाला लागला शिक्षणाचा लळा

सावित्रीबाईंनी दिले शिक्षण
अंगावर झेललेले चिखल आणि शेण

जोतीबांनी बनवले सावित्रींना साक्षर
त्या बनल्या विद्येचे घर.

सावित्रीबाई फुले होत्या महान
आम्हाला वाटतो त्यांचा अभिमान

आदित्य दगडू कांबळे
इ. ७वी

## 16) राख्या पाठवूया, सीमेवरील सैनिकांना

स्वतः बनवलेल्या राख्या जवानांप्रती आदर व्यक्त करण्यासाठी सीमेवरील जवानांना पाठवल्या. देशभक्ती रुजली.

**17) नातेवाईकांच्या जाऊ गावा, पत्राच्या प्रवासातून**

आज मोबाईल व्हाट्सअप च्या जमान्यात पत्र पाठवून, नातेवाईकांची खुशाली विचारणे, दुराप्रस्थ झाले आहे. नातेवाईकांना पत्र पाठवणे किंवा नातेवाईकांचे पत्र आल्यानंतर खूप आनंद वाटायचा. हरविलेली ही प्रथा पुन्हा नव्याने जागृत करण्यासाठी नातेवाईकांना पत्र पाठवण्याचा उपक्रम सुरू केला. आज वर्गातील विद्यार्थी छान छान लिखाण करून पत्रे पाठवितात. यातून भावनिकता आणि नवनिर्मिती विकसित झाली.

## नातेवाईकांच्या जावू गावा,पत्राच्या प्रवासातून विद्यामंदीर कुडू शाळेचा अभिनव उपक्रम

कोल्हापूर/प्रतिनिधी : उपक्रमशिल पदवीदर अध्यापक सुनिल कारंजकर यांनी माझा वर्ग माझी कृती क्षेत्रभेतीतून अध्ययन अनुभूती या उपक्रमातंर्गत सध्याच्या सोशल मिडियाच्या जमान्यात लोप पावत चाललेली पत्र लिहण्याची संस्कृतीला उजाळा देण्याचा प्रयत्न केला. विद्यार्थींना पत्र व पत्रातील मायना,सुरूवात व शेवट कसे लिहावे याचे ज्ञान देवून पत्र लिहिण्यास शिकविले,विद्यार्थ्यांना पत्रे पुरवून आपआपल्या नातेवाईंकाना पत्र लिहिण्याची कृती करवून घेतली लिहिलेली पत्रे पोस्टातून नातेवाईकांना पोहचवली.हा आनंद मुलांच्या चेहऱ्यावर ओंसडून वाहत होता.



कुडू शाळेतील विद्यार्थ्यांनी पत्र लिहण्याचे ज्ञान आत्मसात करून आपआपल्या नोतवाईंना पत्र लिहून दाखवत असतांना

कारंजकर सरांच्या या उपक्रमामुळे वर्गातील सर्व मुले आप आपल्या नातेवाईकांना पत्रे लिहून पाठवू शकली,पत्र लिहिण्याचे ज्ञान मिळाले, पत्राचा प्रवास समजला, पत्राचया माध्यमातून नातेवाईंच्या गावाला पोहचण्याचा आनंद मिळाला.

मोबाईल वॉट्सॲपच्या जमान्यात पत्र पाठविण्याची संस्कृती लोप पावत आहे.मुलांना नातेवाईकांना पत्र लिहता यावे याचे ज्ञान मुलांना असावे हा या उपक्रमाचा हेतू असल्याचा करंजकर यांनी सांगितले.

**18) कारागिरांच्या भेटी जाऊ, कौशल्याची कला पाहू**

लोहार, सुतार व्यवसायिकांना भेटी देऊन व्यवसायांची माहिती घेतली त्यांच्या कौशल्यांची जाणीव करून घेतली.

**19) निबंध, चित्रकला, घोषवाक्य स्पर्धा स्वच्छता पंधरवडा**

स्वच्छता पंधरवडा निमित्त वर्गात निबंध, चित्रकला, घोषवाक्य स्पर्धा घेतल्या विद्यार्थ्यांना ट्रॉफी बक्षीस देऊन गौरविण्यात आले स्पर्धेतून नवनिर्मिती, कला, अभिव्यक्ती यांचा विकास झाला स्वच्छतेचे मूल्य अंगी रुजले.

**20) नाट्य सादर करतोय, आम्ही भांडी बोलतोय**

इयत्ता सातवी वर्गातील मराठी विषयातील भांड्यांच्या दुनियेत या पाठाचे दृढिकरण होण्यासाठी आम्ही भांडी बोलतोय नाट्य सादरीकरण करून घेतले यातून अभिनय, वाचन, क्षमता आवाजातील चढ-उतारपणा या विकासाबरोबरच जुन्या दुर्मिळ भांड्यांचे जतन करण्याचे महत्त्व समजले.

**21) स्मारकास भेट**

छत्रपती शाहू महाराज जन्मस्थळ, न्यू पॅलेस वस्तू संग्रहालय या स्मारकांना भेट देऊन इतिहासाची साधने यापैकी भौतिक साधने यांचे अध्ययन अनुभव घेतले.

**22) आनंदी भेट, उद्यान भेट**

विद्यार्थ्यांच्या मध्ये आनंदी वृत्ती विकसित व्हावी, यासाठी रंकाळा व कणेरी मठ उद्यानांना भेट दिली उद्यानात खेळण्याचा बागडण्याचा मुरमुराद आनंद विद्यार्थ्यांनी लुटला.

**23) आलो कणेरी मठाला, ग्राम जीवन जाणून घेण्याला**

कणेरी मठ येथे असणारे भव्य आणि दिव्य असणारे ग्रामजीवन संस्कृती क्षेत्र भेट दिली. संपूर्ण ग्राम जीवनाची अनुभूती विद्यार्थ्यांना मिळाली.

**24) आजी आजोबांशी बोलू वृद्धाश्रमात**

आज त्रिकोणी कुटुंबात आजी आजोबा दुरावत चालले आहेत. वृध्द माता-पित्यांना वृध्दाश्रमात पाठवण्याची संस्कृती आज वाढत चालली आहे. वृध्दाश्रमातील आजी आजोबांची गाथा ज्ञात व्हावी. आजी-आजोबाबाबत आदर वाढावा. यासाठी विद्यार्थ्यांची वृद्धाश्रमास भेट घडवून आणली.

**25) आलो आम्ही बँकेत, बँकेचे व्यवहार समजलेत**

गणित या विषयातील 'बँक व सरळव्याज' या प्रकरणाची माहिती व्हावी. यासाठी कोल्हापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, शाखा-देवाळे येथे भेट दिली. खाते कसे उघडावे? बचतीचे खाते चलन कसे भरावे? पैसे भरण्याचा फॉर्म, पैसे काढण्याची स्लिप कशी भरावी? याचे प्रात्यक्षिक बँकेत विद्यार्थ्यांकडून करून घेतले. बँक मॅनेजर सांगावकर यांनी खूप चांगली माहिती दिली. बँकेचे व्यवहार अध्ययन अनुभवातून विद्यार्थी शिकलेत.



**26) कोल्हापूरचा रांगडा खेळ- लेझीम खेळायला मी देतो वेळ**

कोल्हापूरचा रांगडा खेळ लेझीम आहे. वर्गातील सर्व विद्यार्थी लेझीम खेळतात. कोल्हापूरचा शाही दसरा महोत्सव, पंचायत समिती स्पर्धा कार्यक्रम, ग्रामपंचायत कुडूं, छत्रपती शाहू महाराज मिरणूक या प्रसंगी लेझीम खेळून सर्वांची वाहवा मिळवीली.

**27) उत्साहाचा प्रबोधनाचा आमचा सांस्कृतिक कार्यक्रम**

सांस्कृतीक कार्यक्रम म्हटले की, उत्साह, आनंद, चैतन्याचा दिवस, शेतकरी नृत्य, स्वातंत्र्याची गाथा, समूहगीत, लेझीम असे कार्यक्रम स्वातंत्र्यदिनी सादर केले. गावातून रु. 15000 बक्षीस मिळाले. सांस्कृतिक कार्यक्रमातून सर्व विद्यार्थी अभिव्यक्त झाले.

**28) आमचे बालवाद्य वृंद**

प्रार्थना समुहगीते, राष्ट्रगीत, ढोल, ड्रम, ताशा, बोंगो, जांबीया, ट्रीपल, घुमके, खंजीर ही सर्व वाद्य विद्यार्थी वाजवतात. प्रार्थना, राष्ट्रगीत, समुहगीते वाद्यावरच वादन करुन म्हटली जातात.

**29) शाळा डिजीटल लोकसहभागातून**

रोटरी क्लब ऑफ कोल्हापूर हेरीटेजकडून प्रोजेक्टर, जयशिवराय तरुण मंडळ कुडूं कडून 3 संगणक, संतोष पाटील-घड्याळ, फौजी सुदाम पाटील-सिलिंग फॅन, प्रत्येक पालकाकडून प्रत्येकी 1000 असे एकूण 22000. उद्योजक संदिप पाटील यांजकडून 2 एल.ई.डी. या दानशूर व्यक्तीच्या मदतीतून शाळा डिजीटल बनली.



कुडूं येथील जय शिवराय तरुण मंडळाचे कार्य कौतुकास्पद -सुनिल कारंजकर

मंडळाकडून कुडूं शाळेस तीन संगणक प्रदान

कोल्हापूर/प्रतिनिधी : तंत्रज्ञानाच्या युगात शाळेच्या उत्कर्षासाठी जय शिवराय तरुण मंडळाने विद्या मंदिर कुडूं शाळेस तीन संगणांचा संच भेट देवून आदर्शवत कौतुकास्पद कार्य केले आहे.हा त्यांचा आदर्श समाजाला प्रेरणादायी आहे.असे प्रतिपादन अध्यापक सुनिल कारंजकर यांनी केले.

कुडूं(ता.करवीर) येथे जय शिवराय तरुण मंडळच्या विद्यमाने कुडूं विद्या मंदिर शाळेस संगणक प्रदान कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.याप्रसंगी करजंकर बोलत होते.यावेळी शाळेचे मुख्याध्यापक बाळासाहेब कांबळे,किरण पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती.

जय शिवराय तरुण मंडळाच्या वतीने नेहमीच विधायक काम केले जात असते.सामाजिक बांधिलकीच्या भावनेतून गावात वेगवेगळ्या माध्यमातून विविध उपक्रम राबविले जात असतात.

यावेळी मंडळाचे कार्यकर्ते विजय पाटील, नारायण साळोखे, आनंदराव पाटील, प्रमोद चौगले, मयूर पाटील, राहूल पाटील, सरदार चौगले, अनिल पाटील, शाळेचे शिक्षक प्रमिलाताई पाटील, सुनिता जाधव, शोभा कांबळे आदी उपस्थित होते.

****************



रोटरी क्लब ऑफ कोल्हापूर हेरिटेजचे कार्य आदर्शवत व प्रेरणादायी - सुनिल कारंजकर

रोटरी क्लब ऑफ कोल्हापूर हेरिटेज कडून कुडूं शाळेस प्रोजेक्ट प्रदान

कोल्हापूर/प्रतिनिधी : डिजिटलच्या युगात विध्यार्थ्यांना अप्रत्यक्ष अध्ययन अनुभव देण्यासाठी व विद्यार्थ्यांची गुणवत्ता वाढविण्यासाठी रोटरी क्लब ऑफ कोल्हापूर हेरिटेज यांनी विद्या मंदिर कुडूं (ता.करवीर) शाळेस प्रोजेक्ट देऊन आदर्शवत, कौतुकास्पद व प्रेरणादायी कार्य केले आहे. असे प्रतिपादन पदवीधर अध्यापक सुनिल कारंजकर यांनी केले.

विद्या मंदिर कुडूं (ता. करवीर) या शाळेस कोल्हापूर येथील रोटरी क्लब कोल्हापूर हेरिटेज कडून प्रोजेक्ट प्रदान करण्यात आला.या प्रसंगी सुनिल कारंजकर बोलत होते.

रोटरी क्लब ऑफ कोल्हापूर हेरिटेज मार्फत नेहमीच विधायक कामे केली जातात. सामाजिक बांधिलकीच्या भावनेतून वेगवेगळ्या माध्यमातून विविध प्रकारचे उपक्रम राबविले जातात. विद्या मंदिर कुडूं शाळेस यापूर्वी ही ऍंक्वागार्ड व विध्यार्थ्यांना आरोग्यदायी वस्तूंचे कीट दिलेले आहेत.

यावेळी रोटरी क्लब ऑफ कोल्हापूर हेरिटेजचे अध्यक्ष अतुल इंगवले, सेक्रेटरी धनंजय थोरात, खाजणीस राहूल गद्रे यांच्या हस्ते शाळेचे मुख्याध्यापक बाळासाहेब कांबळे, पदवीधर अध्यापक सुनिल कारंजकर व शाळेस नेहमी सहकार्य असणारे सामाजिक कार्यकर्ते बाळासाहेब कांबळे कुडुंकर यांच्याकडे प्रोजेक्ट प्रदान करण्यात आला.

रोटरी क्लब ऑफ कोल्हापूर हेरिटेजचे अध्यक्ष अतुल इंगवले, सेक्रेटरी धनंजय थोरात, खाजणीस राहूल गद्रे यांचे हस्ते प्रोजेक्ट स्वीकारताना मुख्याध्यापक बाळासाहेब कांबळे, पदवीधर अध्यापक सुनिल कारंजकर, सामाजिक कार्यकर्ते बाळासाहेब कांबळे कुडुंकर

### 30) फडात आली शाळा, ऊस तोडणी पाहायला

मराठी विषयातील 'तोडणी' या पाठाचे दृढीकरण होण्यासाठी ऊस तोडणी फडात विद्यार्थ्यांना नेऊन ऊस तोडणी अध्ययन अनुभव दिले.



### 31) क्षेत्रभेट - भोगावती सहकारी साखर कारखाना

ऊसापासून साखर बनवण्याची प्रक्रिया, कारखान्याला लागणारी वीज कारखान्यातच बग्यास पासून कशी बनवली जाते. याचे ज्ञान होण्यासाठी भोगावती सहकारी साखर कारखान्याला विद्यार्थ्यांची क्षेत्रभेट घडवून आणली.

### 32) सैनिक, वकील, पोलीस उपनिरीक्षक आपल्या भेटीला

सैनिक, वकील, पोलीस उपनिरीक्षक यांना वर्गात भेट देण्यास सांगून आपले अनुभव व करिअर मार्गदर्शन या विषयावर त्यांच्याकडून माहिती घेतली. पोलीस निरिक्षक मा. कुमार ढेरे, ॲड. मा. प्रकाश पाटील, सैनिक मा. सुदाम पाटील यांनी आपले अनुभव सांगितले.



**विद्यार्थ्यांना प्रेरणा देणारा कुर्डू शाळेचा नावीन्यपूर्ण उपक्रम वकील सैनिक आपल्या भेटीला**

कुर्डू/प्रतिनिधी : विद्यामंदिर कुर्डू (ता.करवीर) शाळेतील पदवीधर अध्यापक सुनिल कारंजकर यांनी माझा वर्ग माझी कृती क्षेत्रभेटीतून अध्ययन अनुभूती, अध्ययन अनुभव देणारा नावीन्यपूर्ण उपक्रम हाती घेतला असून या उपक्रमांतर्गत वकील,सैनिक आपल्या भेटीला. हा उपक्रम इयत्ता सातवीच्या विद्यार्थ्यांसाठी राबविण्यात आला.या उपक्रमामध्ये मार्गदर्शन करण्यासाठी वकिल प्रकाश पाटील व सैनिक सुदाम पाटील यांना निमंत्रित करण्यात आले होते. या उपक्रमाला विद्यार्थ्यांचा खूप चांगला प्रतिसाद मिळाला.

ज्यांना वकील म्हणून आपलं करिअर करायचे आहे त्यांनी ग्रॅज्युशन पूर्ण केल्यानंतर फौजदारी किंवा दिवाणी अशा विभागामध्ये आपल्याला वकिली कोर्स करता येतो.त्यासाठी आत्तापासूनच खूप अभ्यास करा. आणि आपलं आयुष्य उज्ज्वल करा. असे मत वकिल प्रकाश पाटील यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना व्यक्त केले.

तसेच सैनिक सुदाम पाटील म्हणाले,देशाच्या संरक्षणाची जबाबदारी ही सैनिकांवर अवलंबून असते. सैनिक आपल्या प्राणांची बाजी लावून सीमेवर देशाची सेवा बजावत असतो. मी सैनिक म्हणून देशाची सेवा केल्याचा मला नेहमी सार्थ अभिमान वाटतो. तुम्हीसुद्धा आपणास अभिमान वाटेल असे क्षेत्र निवडून करिअर करा. कारंजकर सरांचा चालू असलेला हा उपक्रम स्तुत्य आहे. त्यांच्या मार्गदर्शनाखाली वाटचाल करा. यश तुमचेच आहे. असे उदगार सैनिक सुदाम पाटील यांनी मार्गदर्शन करताना काढले.

विद्यार्थ्यांना आपले करिअर आत्तापासूनच निवडून त्यादृष्टीने आपले लक्ष्य त्याकडे केंद्रीत केल्यास त्यांना पुढे अडचण येणार नाही यासाठी विविध क्षेत्रातील व्यक्तींना निमंत्रित करून त्यांच्याकरवी त्यांचे कार्य कसे चालते याविषयी माहिती विद्यार्थ्यांना व्हावी यासाठी कारंजकर यांनी स्तुत असा उपक्रम हाती घेतला आहे. याबद्दल विद्यार्थी व पालकांच्याकडून त्यांच्या उपक्रमाचे कौतुक करण्यात येत आहे.



**कुर्डू शाळेचा उपक्रम पोलिस उपनिरिक्षक आपल्या भेटीला**

कोल्हापूर/प्रतिनिधी : विद्यार्थ्यांना भावी आयुष्यातील करिअर करण्यासंदर्भात विविध क्षेत्रांची माहिती व्हावी,करिअर करण्याच्या दृष्टीने काय करावे लागते,कोणती पावले उचलावी लागतात याचे ज्ञान शालेय जीवनापासूनच विद्यार्थ्यांना मिळावे या हेतूने अध्यापक सुनिल कारंजकर यांनी उपक्रम हाती घेतला असून या उपक्रमांतर्गत पोलिस उपनिरिक्षक आपल्या भेटीला हा उपक्रम राबवून पोलिस उपनिरिक्षकाचे कार्य,त्यांचे देशासाठी योगदान याविषयी महिती करून देण्यासाठी आजरा पालिस स्टेशनचे पोलिस उपनिरिक्षक कुमार ढेरे यांना शाळा भेटीसाठी आमंत्रित करण्यात आले होते.

माझा वर्ग माझी कृती क्षेत्रभेतीतून अध्ययन अनुभूती या उपक्रमातर्गत पोलिस उपनिरिक्षक कुमार ढेरे यांनी कुर्डू (ता.करवीर) या शाळेतील इयत्ता ७ वी च्या वर्गाला भेट देवून मार्गदर्शन केले.

यावेळी मार्गदर्शन करतांना ढेरे म्हणाले,आपले ध्येय आत्ताच आपण ठरवून त्यादृष्टीने वाटचाल करायला हवी त्यासाठी प्रचंड अभ्यास करण्याची व कष्ट घेण्याची सवय स्वत:ला लावून घेतली पाहिजे.अभ्यासात व्यत्यय निर्माण करणाऱ्या बाबी दूर केल्या पाहिजेत.व्यसनापासून दूर राहून अभ्यास आणि व्यायामाचे व्यसन लावून घेतले तरच आपले भविष्य उज्वल होवू शकते असे मत पो,उपनिरिक्षक ढेरे यांनी व्यक्त केले.

यावेळी विद्यार्थीनी संचिता पाटील हिने स्वागत केले.विद्यार्थी व पालकांच्यातून सुनिल कारजंकर यांनी राबविलेल्या या उपक्रमाबद्दल कौतुक होत आहे.

**33) पालक अभिप्राय, आपल्या भेटीला**

आपल्या पाल्याची प्रगती, अभ्यासाबाबत अडचणी समस्या, अपेक्षित बाबी याविषयी माहिती अभिप्राय वहीत पालकांनी नि:संकोच लिहावे. यासाठी फिरती पालक अभिप्राय वही प्रत्येक पालकापर्यंत फिरत पोहोचत होती. या वहीची विद्यार्थ्यांची गुणवत्ता वाढवण्यासाठी मोलाची मदत झाली.

**उपक्रम पूर्ण झाल्यावर केलेली निरीक्षणे व त्याच्या नोंदी**

प्रस्तुत उपक्रम पूर्ण झाल्यावर केलेल्या निरीक्षणातून पुढील बाबी दिसून आल्या.

- वर्गाची शंभर टक्के उपस्थिती वाढली.
- मुलांमध्ये उत्साह वाढला.
- मुले आनंदी दिसू लागली.
- संबोध, संकल्पना समजू लागल्या.
- अवघड भाग सोपा झाला.
- स्व निर्मितीस संधी मिळाली. विद्यार्थी स्वनिर्मिती करू लागले.
- विद्यार्थ्यांची गुणवत्ता वाढली.
- क्षमता प्राप्त झाल्या.
- अध्ययन निष्पत्ती प्राप्त झाली.
- धाडसी वृत्ती बनली.
- आत्मविश्वास वाढला.
- अभिव्यक्तीचा विकास झाला.
- अभिरुची वाढली.
- गृहपाठ स्वाध्याय सोडवू लागली.
- प्रयोग करू लागले. अनुमान काढू लागले.
- संस्कार मूल्ये रुजली.
- मी ही कविता लिहू शकतो याची जाणीव झाली.
- देशभक्ती वाढली.
- व्यक्त होऊ लागली.
- व्यवसायाचे ज्ञान मिळाले.
- सैनिक, वकील, पोलीस उपनिरीक्षक यांची माहिती व प्रेरणा मिळाली.
- कला, कार्यानुभव विषयाचा विकास झाला.
- संगीत वाद्य वाजवू लागली.
- शारीरिक, बौद्धिक व भावनिक विकास झाला.

**कार्यवाहीत आलेल्या अडचणी**

नवोपक्रम राबवित असताना आलेल्या अडचणी खालील प्रमाणे-

1) क्षेत्रभेटीसाठी प्रवास वाहनाची गरज होती.

प्रस्तुत उपक्रम क्षेत्रभेटी व कृतीवर आधारित असल्याने क्षेत्रभेटीसाठी वाहनांची जरुरी होती ही समस्या सोडवण्यात आली माझी गाडी व शाहाजी पाटील यांनी आपली गाडी दिली या दोन वाहनांतून क्षेत्रभेटीचा प्रवास सुखकर झाला.


2) क्षेत्रभेटी प्रसंगी एखाद्या वेळी कोणताही अपघात होऊ नये. अशी काळजी मनात राहायची सुदैवाने क्षेत्रभेटी उपक्रम सुरळीत पार पडला.

3) क्षेत्रभेटीसाठी पालक प्रथमत: राजी नव्हते. प्रबोधनानंतर त्याची मानसिकता तयार झाली.

**निरीक्षण नोंदीवरुन विश्लेषण**

| अ.नं. | निरीक्षणातील कृतीतील साधीत मुद्दे | पुर्व स्थिती | टक्केवारी | उत्तर स्थिती | टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| 1 | आई-वडील/गुरुजन/वडीलधारी यांच्या पाया पडणारे | 2 | 9.09% | 22 | 100% |
| 2 | स्वरचित कविता / निबंध/गोष्टी लिहिणारे | 1 | 4.54% | 20 | 95.45% |
| 3 | लेझिम खेळणारे | 1 | 4.54% | 21 | 90.90% |
| 4 | विज्ञान प्रयोग व भौमितिक कृती करणारे | 3 | 13.63% | 21 | 95.45% |
| 5 | नाट्यअभिनयात भाग घेणारे | 1 | 4.54% | 20 | 90.90% |
| 6 | क्षेत्रभेटीत सहभाग घेणारे | 3 | 13.63% | 22 | 100% |
| 7 | सांस्कृतिक कार्यक्रमात सहभाग घेणारे | 3 | 13.63% | 21 | 95.45% |
| 8 | कला/कार्यानुभव/इतर वस्तू बनविणारे | 3 | 13.63% | 22 | 100% |
| 9 | विविध स्पर्धेत सहभाग घेणारे | 4 | 18.18% | 20 | 90.90% |
| 10 | परिपाठ / समूहगीते याप्रसंगी वाद्य वाजविणारे | 2 | 9.09% | 12 | 54.54% |
| 11 | स्वनिर्मिती करणारे | 1 | 4.54% | 21 | 95.45% |
| 12 | वर्गसजावट / शै. साधने / प्रदर्शन यात सहभाग घेणारे | 3 | 13.63% | 22 | 100% |
| 13 | मूल्यांचे पालन करणारे | 4 | 18.18% | 22 | 100% |

## आलेख- निरीक्षण नोंदी / कृतीतील साधित मुद्द्यांची पूर्वस्थिती व उत्तरस्थिती दर्शक




**पूर्व चाचणीवरुन विश्लेषण**

| अ.नं. | पूर्व चाचणीमधील प्रश्न स्वरुप | बरोबर उत्तरे विद्यार्थ्यांची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| 1 | पानकळा नाचत केव्हा येईल असे कवीला वाटते? | 2 | 9.09 |
| 2 | मूक-बधिरांच्या शाळेविषयी माहिती सांगा | 3 | 13.63 |
| 3 | Read the Story | 3 | 13.63 |
| 4 | Tell Myself, My father, My mother, Teacher | 2 | 9.09 |
| 5 | हिम्मत करनेवाले को किसकी मदत मिलती है? | 4 | 18.18 |
| 6 | त्रिकोणाचे बाजूवरुन व कोनावरुन प्रकार सांगा | 4 | 18.18 |
| 7 | रेषा AB वर रेषा MN लंब काढा | 3 | 13.63 |
| 8 | विस्थापन झाले असे केव्हा म्हणता येईल. | 2 | 9.09 |
| 9 | छाया म्हणजे काय? | 4 | 18.18 |
| 10 | महेंद्रवर्मनची कामगिरी सांगा | 2 | 9.09 |
| 11 | संघम साहित्य म्हणजे काय? | 2 | 9.09 |
| 12 | आपल्या मुलभूत गरजा कोणत्या? | 4 | 18.18 |
| 13 | शहारामध्ये आढळणाऱ्या समस्या कोणत्या? | 3 | 13.63 |
| 14 | खनिजांचे उपयोग सांगा | 3 | 13.63 |
| 15 | उर्जा साधनांची गरज का असते | 4 | 18.18 |

**उत्तर चाचणीवरुन विश्लेषण**

| अ.नं. | उत्तर चाचणीमधील प्रश्न स्वरुप | बरोबर उत्तरे विद्यार्थ्यांची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| 1 | मीराने वसंताला तमसो मा ज्योतिर्गमय चा सांगितलेला अर्थ. | 20 | 90.90% |
| 2 | भांड्याचे उपयोग सांगा | 21 | 95.45% |
| 3 | Read the Story | 22 | 100% |
| 4 | Tell Myself, My father, My mother, Teacher | 20 | 90.90% |
| 5 | गॉवों मे अभी भी कौन-कौन सी समस्याएँ है? | 19 | 86.36% |
| 6 | 80 चा कोन काढा व तो दुभागा. | 19 | 86.36% |
| 7 | 55 च्या कोटीकोनाचे माप किती? | 20 | 90.90% |
| 8 | उंटाला वाळवंटातील जहाज का म्हणतात? | 18 | 81.81% |
| 9 | वनस्पतीच्या अवयवांची कार्ये सांगा. | 19 | 86.36% |
| 10 | भौतिक साधने कोणती? | 18 | 81.81% |
| 11 | संत तुकारामाचे कार्य सांगा | 18 | 81.81% |
| 12 | संविधानातील तरतूद सांगा | 19 | 86.36% |
| 13 | प्रौढ मतदान पध्दती म्हणजे काय? | 20 | 90.90% |
| 14 | सुर्यग्रहणाचे प्रकार सांगा | 19 | 86.36% |
| 15 | भरती कशास म्हणतात? | 17 | 77.27% |

आलेख (गुणवत्तावाढीचा-घटकावर आधारित)




**प्रश्न क्रमांक**

**6. उपक्रमाची यशस्विता / फलनिष्पत्ती (उद्दिष्टानुसार)**

विद्यार्थ्यांना कृतीतून आणि क्षेत्रभेटीतून अध्ययन अनुभव दिल्यामुळे उपक्रमाच्या उद्दिष्टानुसार इच्छित फलनिष्पत्ती प्रस्तुत उपक्रमातून साध्य झाली.

1) क्षेत्रभेटी व कृतीतून अध्ययन अनुभूती घेणे.

क्षेत्रभेटी व प्रतिदिन विद्यार्थ्यांनी प्रत्यक्ष अध्ययन अनुभव घेतल्यामुळे विषयातील संबोध संकल्पना अधिक स्पष्ट झाल्या. मिळालेले अध्ययन अनुभव चिरकाल स्मरणात राहण्यास मदत झाली. आनंददायी पद्धतीने अध्ययन अनुभव घेता आले अध्ययनातील उत्साह वाढला. प्रश्न, मनातील शंका विद्यार्थी नि:संकोचपणे धाडसाने विचारू लागले. पालक, शेजारी, समाज यांच्या अनुभवातून परिसरातील जे जे नाविन्यपूर्ण वाटते त्याबाबत अध्ययन अनुभव घेण्याची सवय विद्यार्थ्यांना लागली.

2) सर्व विषयातील क्षेत्र निहाय सर्व क्षमता अध्ययन निष्पत्ती प्राप्त करणे.

अध्ययन अनुभूतीतून कृती व क्षेत्रभेटीच्या माध्यमातून अध्ययन केल्यामुळे क्षेत्रनिहाय सर्व क्षमता व अध्ययन निष्पत्ती सर्व विद्यार्थ्यांना प्राप्त झाल्या. अध्ययनाची अभिवृत्ती व अभिरुची वाढली अध्ययन अनुभूतीतून ज्ञान मिळाल्यामुळे सर्व विद्यार्थी स्वाध्याय व गृहपाठ उत्साहाने बिनचूक सोडवू लागले. विज्ञान विषयातील प्रयोगात सहभाग घेऊन निरीक्षणातून अनुमान काढू लागले. स्मारके, नाणी, वस्तुसंग्रहालय ग्रामीण जीवन यांचे प्रत्यक्ष अध्ययन अनुभवातून ज्ञान मिळाले.

3) संस्कार मूल्ये रुजवणे

आई-वडिलांच्या, आजी-आजोबांच्या, गुरुजनांच्या दररोज पाया पडून नमस्कार करण्याची कृती करू लागले. सहका-यांना मदत करण्याची सवय

लागली स्वतः राख्या बनवून, सीमेवरील सैनिकांना पाठवून, राष्ट्रभक्तीची मूल्ये रुजविली.

4) स्व: निर्मितीचा आनंद मिळवणे.

स्वरचित कविता, निबंध, छोट्या छोट्या गोष्टींच्या लिखाणातून स्वनिर्मितीचा आनंद मिळाला. मी सुध्दा कविता करू शकतो याविषयी आत्मविश्वास वाढला विद्यार्थी लेखणीच्या माध्यमातून व्यक्त होऊ लागले.

5) व्यवसायाची, उद्योगाची, कारखान्याची माहिती करून घेणे.

सुतार, लोहार, कुक्कुटपालन, डुक्कर पालन, शेळीपालन, गायपालन, शेती व्यवसाय यासारख्या परिसरातील व्यवसायांची ओळख झाली. कारखाना क्षेत्रभेटीतून ऊसापासून साखर बनवण्याची प्रक्रिया, कारखान्यास होणारा विजेचा पुरवठा याबाबत सखोल ज्ञान मिळाले. सैनिक, वकील, पोलीस उपनिरीक्षक यांचे प्रत्यक्ष अनुभव ऐकायला मिळाले.

6) कला, हस्तकला, कार्यानुभव कौशल्ये आत्मसात करणे.

राख्या, आकाश कंदील, कोलाज, ओरिगामी वस्तू बनवल्यामुळे कार्यानुभव विषयाचे कौशल्य आत्मसात झाले विद्यार्थ्यांनी स्वत: बनविलेल्या शैक्षणिक साधनांमुळे अध्ययन अनुभूती मिळाली. चित्रात सुंदर रंग भरू लागले. रांगोळी सुंदर काढू लागले समूहगीत ताला सुरात म्हणू लागले. परिपाठास प्रार्थना राष्ट्रगीत, समूहगीते, ढोल, ड्रम, ताशा, बोंगो, चांग, जांबिया, खंजिरी या वाद्यावर वाजवल्याने वादन कौशल्य विकसित झाले.

7) शारीरिक, बौद्धिक, भावनिक विकास वाढवणे.

खेळ या कृतीतून विद्यार्थ्यांचा शारीरिक विकास झाला लेझीम खेळातून शारीरिक विकासाबरोबर चपळता, काटकपणा विकसित झाला. अध्ययन अनुभवातून व कृतीतून अध्ययन केल्याने बौद्धिक विकास झाला. वृध्दाश्रमास भेट देऊन त्यांचे आत्मविचार जाणून घेतल्याने विद्यार्थ्यांच्यात भावनिक विकास वाढला.

**समारोप**

इयत्ता 7 वी वर्गातील विद्यार्थी अध्ययनात समरस होत नव्हती. विषयातील संबोध, संकल्पना, आशयाचे आकलन त्यांना लवकर होत नसल्याचे निदर्शनास येत होते. अभ्यासात टंगळामंगळ करत होती. गुणवत्तेत व भाषिक कौशल्यात मागे पडत होती. शिक्षणात त्यांची अभिवृत्ती व अभिरुची दिसून येत नव्हती. त्यांना अभ्यासाच्या प्रवाहात आणण्यासाठी अध्ययनाची अभिरुची निर्माण होण्यासाठी शैक्षणिक गुणवत्ता व भाषिक कौशल्यांचा विकास घडवून आणण्यासाठी अध्ययन अनुभवातून अध्ययनास प्रवृत्त करणारा ‘माझा वर्ग माझी कृती क्षेत्रभेटीतून अध्ययन अनुभूती’ या उपक्रमाने वर्गातील सर्व विद्यार्थ्यांच्यात परिवर्तन घडवून आणले. विद्यार्थ्यांचा उत्साह वाढीस लागला. आनंदाने अध्ययन अनुभव घेऊ लागले. विद्यार्थ्यांचा बघता बघता कायापालट होऊन सर्वांगीण विकास झाला.

‘अवघड ते सोपे झाले हो,
अध्ययन अनुभवाने मला कळले हो’

**8. संदर्भ सूची व परिशिष्टे**

संदर्भसूची

| अ.नं. | पुस्तकाचे नाव | लेखकाचे नाव | पुस्तक प्रकाशनाचे नाव | पुस्तक प्रकाशन वर्षे |
|---|---|---|---|---|
| 1 | शालेय नवोपक्रम | - | म.रा.शै.सं.व प्रशि. परिषद, पुणे | 2022 |
| 2 | उपक्रमशिलतेकडून कृतिसंशोधनाकडे | सिध्दाराम माशाले | अभिषेक प्रकाशन, सोलापूर | 2011 |
| 3 | रचनावादी शिक्षण | डॉ. लीला पाटील | ज्ञानसंवर्धन प्रकाशन, कोल्हापूर | 2017 |
| 4 | नवे शिक्षण, नवे प्रवाह | डॉ. सुनिलकुमार लवटे | अक्षरदालन, कोल्हापूर | 2016 |
| 5 | जीवन शिक्षण अंक | | | |
| 6 | शिक्षण संक्रमण मासिक | | | |

**परिशिष्ट-अ**

**नवोपक्रमात सहभागी विद्यार्थी यादी**

शाळेचे नाव : विद्यामंदिर कुर्डू, ता. करवीर

| अ.नं. | विद्यार्थ्यांची नावे | इयत्ता |
|---|---|---|
| 1 | कांबळे आदित्य दगडू | 7 वी |
| 2 | कांबळे प्रबुध्द अमर | 7 वी |
| 3 | रजपूत सिध्दार्थ जितेंद्र | 7 वी |
| 4 | चौगले अथर्व अनिल | 7 वी |
| 5 | पाटील वेदांत रघुनाथ | 7 वी |
| 6 | पाटील रणवीर अभिजीत | 7 वी |
| 7 | पाटील सोहम संतोष | 7 वी |
| 8 | पाटील सार्थक सुदाम | 7 वी |
| 9 | सुतार सतेज कृष्णात | 7 वी |
| 10 | चौगले अवधूत जयसिंग | 7 वी |
| 11 | साळोखे सार्थक नारायण | 7 वी |
| 12 | पाटील कार्तिक पांडुरंग | 7 वी |
| 13 | पाटील अवधूत प्रकाश | 7 वी |
| 14 | कांबळे कार्तिकी जनार्दन | 7 वी |
| 15 | सुतार प्राजक्ता तानाजी | 7 वी |
| 16 | पाटील रेणू कर्तारसिंग | 7 वी |
| 17 | साठे स्वरांजली सरदार | 7 वी |
| 18 | पाटील वैदही ब्रम्हा | 7 वी |
| 19 | पाटील तनया विष्णू | 7 वी |
| 20 | पाटील संचिता सागर | 7 वी |
| 21 | चौगले अंजली अनिल | 7 वी |
| 22 | पाटील अंतरा श्रीकांत | 7 वी |

## परिशिष्ट - ब

## पूर्व चाचणी - प्रश्नावली

विद्यार्थ्यांचे नाव                                        इयत्ता- सातवी

शाळा विद्यामंदिर कुर्डू

प्रश्न-

1) पानकळा नाचत केव्हा येईल असे कवीला वाटते?
2) मूकबधिरांच्या शाळेविषयी माहिती सांगा.
3) Read the Story
4) Tell Myself, My father, My mother, Teacher
5) हिम्मत करने वाले को किसकी मदत मिलती है?
6) त्रिकोणाचे बाजूवरून व कोनावरून प्रकार सांगा.
7) रेषा AB व रेषा MN लंब काढा.
8) विस्थापन झाले असे केव्हा म्हणता येईल.
9) छाया म्हणजे काय?
10) महिंद्र वर्मनची कामगिरी सांगा.
11) संघम साहित्य म्हणजे काय?
12) आपल्या मूलभूत गरजा कोणत्या?
13) शहरांमध्ये आढळणाऱ्या समस्या कोणत्या?
14) खनिजांचा उपयोग सांगा.
15) ऊर्जा साधनांची गरज का असते?

**उत्तर चाचणी - प्रश्नावली**

विद्‍यार्थ्यांचे नाव

शाळा : विद्‍या मंदिर कुर्डू

प्रश्न

1 मीराने वसंताला ‘तमसो मा ज्योतिर्गमय’ चा सांगितलेला अर्थ.

2 भांड्याचे उपयोग सांगा

3 Read the Story

4 Tell Myself, My father, My mother, Teacher

5 गॉवों मे अभी भी कौन-कौन सी समस्याएँ है?

6 $80^0$ चा कोन काढा व तो दुभागा.

7 $55^0$ च्या कोटीकोनाचे माप किती?

8 उंटाला वाळवंटातील जहाज का म्हणतात?

9 वनस्पतीच्या अवयवांची कार्ये सांगा.

10 भौतिक साधने कोणती?

11 संत तुकारामाचे कार्य सांगा.

12 संविधानातील तरतूदी सांगा.

13 प्रौढ मतदान पध्दती म्हणजे काय?

14 सुर्यग्रहणाचे प्रकार सांगा

15 भरती कशास म्हणतात?

# माझा वर्ग माझी कृती, क्षेत्रभेटीतून अध्ययन अनुभूती

## सुनिल कारंजकर यांचा अनुभवातून अध्ययन करणारा अभिनव उपक्रम

कुई/प्रतिनिधी : विद्यामंदिर कुई (ता. करवीर) या शाळेतील पदवीधर अध्यापक सुनिल कारंजकर हे उपक्रमशील शिक्षक म्हणून प्रसिध्द आहेत. विद्यार्थ्यांना पाठ्यपुस्ताका बरोरबच जीवनाशी निगडीत असलेल्या सर्व क्षेत्राचा चार भिंतीच्या पलिकडेचे शिक्षण देण्याचा प्रयत्न ते सातत्याने करीत असतात.गेल्या जून महिन्यापासून त्यांनी इयत्ता ७ वी वर्गातील विद्यार्थ्यांना अध्ययन अनुभवातून शिकणारा माझा वर्ग माझी कृती असा नावीन्यपूर्ण उपक्रम राबविला.



मा.सुनिल कारंजकर

या उपक्रमाचा उद्देश, क्षेत्रभेटीतून व कृतीतून अध्ययन अनुभूती घेणे, क्षेत्रनिहाह क्षमता व अध्ययन निष्पती प्राप्त करणे, संस्कार - मूल्ये रुजविणे, स्वनिर्मितीचा आनंद मिळवणे, व्यवसाय, उद्योग, कारखान्यांची माहिती करून घेणे, कला, हस्तकला, कार्यानुभव विषयांचे कौशल्य आत्मसात करणे व आपली गुणवत्ता वाढविणे हा होता. जून महिन्यापासून त्यांनी हाती घेतलेल्या उपक्रमात जवळपास २८ विविध उपक्रम राबवून विद्यार्थ्यांची ज्ञानाची कवाडे खुली खेली आहेत.भविष्यात आपल्या आवडीने ज्या क्षेत्रामध्ये करिअर करायचे आहे त्या करीअर संदर्भात प्राथमिक माहिती त्या क्षेत्रातील मान्यवर व्यक्तींना प्रत्यक्ष बोलावून त्यांच्या करवी मार्गदर्शन करून दिले आहे.देशभक्ती जागृत करून समाजामध्ये आपले वर्तन कसे आसावे ज्याने समाजाची व देशाची प्रगती होईल व देश घडविणारा एक सुज्ञान नागरीक कसा तयार होईल हा दृष्टीकोन ठेवून कारंजकर यांनी कृतीशील उपक्रम राबवून विद्यार्थ्यांच्यामध्ये चेतना निर्माण करण्याचे काम केले आहे.

यापूर्वी कोरोना काळात सर्व शाळांना कुलूपे असतांना त्यांनी विद्यार्थ्यांना निसर्गाच्या साधिन्यात झाडाखाली शाळा भरवून ज्ञान देण्याचे काम केले आहे.कोणतीही सुट्टी न घेता आपला विद्यार्थी घडला पाहिजे हा विचार घेवून ते विद्यार्थ्यांच्या सेवेसाठी तत्पर असतात.ते बदली होवून ज्या शाळेत जातील तेथे ते विद्यार्थीप्रिय शिक्षक होतात. तनमनधनाने ते विद्यार्थ्यांना पाठ्यक्रम अभ्यासाबरोबरच अंवातर ज्ञान देण्याचा त्यांचा प्रयत्न राहिला आहे. सांस्कृतिक,कला हे त्यांचे आवडीचे विषय आहेत.

त्यांच्या या उपक्रमाचे विद्यार्थी,पालक व शिक्षण क्षेत्रातून कौतुक होत आहे.

### राबविण्यात आलेले उपक्रम

सर्वांगीण विकास साधणाऱ्या अशा या उपक्रमांतर्गत १)शाळा आली जंगल परिसरात, भार पडली आमच्या ज्ञानात २)कृती करू भूमिती शिकू ३)आलेख काढू उत्तरे देऊ.४)खेळ खेळूया शब्दांचा ५) शैक्षणिक साधनातून ज्ञान, अप्रत्यक्ष अनुभवातून ज्ञान ६) भरवू प्रदर्शन भांड्यांचे, धान्यांचे, नाण्यांचे.७)शाळा भरली शेत शिवारात, मुले रमली ऊस लावणी करण्यात.८)खेळ खेळू सूर्य, चंद्र पृथ्वीचा.८)माझे निरीक्षण माझे अनुमान.९)कार्यानुभवातून थोडे अर्थोत्पादन.१०)प्रयोगातून विज्ञान, विज्ञानातून सज्ञान.११)प्राथमिक व्यवसायचे ज्ञान, भेट पशु पक्षी पालन.१२)स्वनिर्मिती आमची- निबंध,कवितांची.१३) राख्या पाठवूया सीमेवरील सैनिकांना.१४) नातेवाईकांच्या जाऊ गावा पत्राच्या प्रवासातून.१५) कारागीरांच्या भेटी जाऊ कौशल्याची कला पाहू.१६)निबंध, चित्रकला, घोषवाक्य स्पर्धा - स्वच्छत्ता पंधरावडा.१७)नाट्य सादर करतोय आम्ही भांडी बोलतोय.१८)स्मारकास भेट.१९)आनंदी भेट उद्यान.१९)आलो कणेरी मठाला ग्रामजीवन जाणून घेण्याला.२०)आजी आजोबांशी बोलू वृद्धाश्रमात.२१)आलो आम्ही बँकेत, बँकेचे व्यवहार समजलेत.२२)कोल्हापूरचा रांगडा खेळ लेझीम खेळायला मी देतो वेळ.२३)उत्साहाचा प्रबोधनाचा आमचा सांस्कृतिक कार्यक्रम.२४)आमचे बालवाद्यवृंद २५) शाळा डिजिटल लोकसहभागातून.२६)फडात आली शाळा ऊस तोडणी पहायला.२६)क्षेत्राभेट भोगावती सहकारी साखर कारखाना.२७)सैनिक, वकील, पोलीस उपनिरीक्षक आपल्या भेटीला.२८)पालक अभिप्राय आपल्या भेटीला. असे नावीन्यपूर्ण अभिवृत्ती,अभिरुची निर्माण करणारे उपक्रम घेऊन माझा वर्ग माझी कृती - क्षेत्रभेटीतून अध्ययन अनुभूती महा उपक्रम यशस्वी केला आहे.










# स्वच्छता पंधरवडा उपक्रमांतर्गत विद्या मंदिर कुईू शाळेत विविध स्पर्धा संपन्न



कुई/प्रतिनिधी : स्वच्छता पंधरवडा उपक्रमांतर्गत विद्या मंदिर कुई (ता.करवीर ) येथील शाळेत विद्यार्थांच्या कलागुणांना वाव मिळावा यासाठी विविध स्पर्धा घेण्यात आल्या होत्या. या स्पर्धाचे आयोजन पदवीधर अध्यापक सुनिल कारंजकर यांनी केले होते.विजेत्या स्पर्धकांना शालेय व्यवस्थापन समिती सदस्य रघुनाथ पाटील , केंद्र मुख्याध्यापिका अलका कारंजकर , सुदाम पाटील फौजी, अक्काताई पाटील, विश्वास चौगले यांच्या हस्ते बक्षीस वितरण करण्यात आले.

या स्पर्धांतर्गत स्वच्छतेवर निबंध स्पर्धा, चित्रकला स्पर्धा, घोषणा पाठांतर आदि स्पर्धा घेण्यात आल्या. विजेत्या स्पर्धकांना संघम फौंडेशनच्या उपाध्यक्षा व केंद्र नागावच्या केंद्र मुख्याध्यापिका अलका कारंजकर यांनी ट्रॉफी देवून त्यांना गौरविण्यात आले.

या स्पर्धेचे निकाल जाहीर करण्यात आले आहेत यामध्ये निबंध लेखन स्पर्धामध्ये **प्रथम क्रमांक** - तनया पाटील,द्वितीय क्रमांक अंतरा पाटील ,तृतीय क्रमांक - आदित्य कांबळे

**चित्रकला स्पर्धा** - प्राजक्ता सुतार व अंजली चौगले - प्रथम विभागून, सतेज सुतार व स्वरांजली साठे - द्वितीय विभागून, आदित्य कांबळे व अंतरा पाटील - तृतीय विभागून, वैदही पाटील, तर उत्तेजनार्थ- सार्थक नारायण साळोखे, अवधूत जयसिंग चौगले

**घोषणा पाठांतर** - वैदही पाटील - प्रथम, संचिता पाटील - द्वितीय, स्वरांजली साठे - तृतीय

या प्रसंगी सरदार साठे, नारायण साळोखे, जितेंद्र रजपूत, श्रीकांत पाटील, विष्णू पाटील, कृष्णात सुतार, संतोष पाटील,अमर कांबळे, प्रकाश पाटील,हिंदुराव पाटील नीलम पाटील, रंजना सुतार, भाग्यश्री पाटील, चंद्रभागा चौगले आदि मान्यवर उपस्थित होते. सूत्रसंचालन व आभार सुनिल कारंजकर यांनी मानले.